सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## इंदिरा गांधी माझ्यासाठी सर्वात मोठ्या व्हिलन : मुख्यमंत्री

मुंबई : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारताच्या दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबाबत एक खळबळजनक वक्तव्य केले आहे. इंदिरा गांधी माझ्यासाठी सर्वात मोठ्या व्हिलन होत्या, असं वक्तव्य फडणवीसांनी केलं आहे.त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यात वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.



फडणवीसांनी कंगना राणौतच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या स्क्रीनिंगला हजेरी लावली. यावेळी इमर्जन्सी चित्रपट आणि या चित्रपटाच्या टीमचं कौतुक करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आणीबाणी आपल्या सर्वांसाठी असा काळ होता, जेव्हा देशातील सगळ्या नागरिकांचे मानवाधिकार समाप्त करण्यात आले होते. हा काळ माझ्यासाठी वैयक्तिकरित्या महत्वाचा आहे. कारण आणीबाणीच्या काळात माझे वडील जवळपास दोन वर्षे तुरुंगात होते. तेव्हा मी केवळ पाच वर्षांचा होतो. त्यावेळी मला वडिलांना भेटायचं असेल तर न्यायालय किंवा तुरुंगात जावं लागायचं. आजही त्या आठवणी माझ्या मनात ताज्या आहेत.

पुढे ते म्हणाले, आता तो आणीबाणीचा काळ पुन्हा एकदा कंगनाने चित्रपटाच्या माध्यमातून आपल्या समोर आणला आहे. कंगना स्वत: या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. ती प्रत्येक व्यक्तिरेखेला न्याय देते. ती एक उत्कृष्ट अभिनेत्री आहे. इंदिरा गांधी देशाच्या खूप मोठ्या नेत्या होत्या. पण त्या काळात त्या आमच्यासाठी खूप मोठ्या व्हिलन होत्या. पण ठीक आहे. प्रत्येक कालखंडाची एक वेगळी कहाणी असते. इंदिरा गांधी यांनीही आपल्या देशासाठी चांगलं काम केलं आहे, असे देखील देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## राणीबागेच्या पार्किंग शुल्कात चारपट वाढ!

मुंबई : भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयातील पार्किंग शुल्कात थेट चारपट वाढ करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. चारचाकी वाहनांना २० रुपयांऐवजी ८० रुपये, तर दुचाकीस्वारांना १० रुपयांऐवजी ३० रुपये मोजावे लागणार असल्याने राणी बाग महागली आहे.

देशविदेशातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय म्हणजेच राणीबागेत दररोज ८ ते १० हजार पर्यटक येतात. पालिकेच्या उद्यान व प्राणिसंग्रहालयात प्रवेशद्वारातून परिसरातील दुकानदारही आपली वाहने आणून लावतात. संपूर्ण दिवसभर वाहने पार्क करून फक्त दहा ते वीस रुपये मोजतात. हे निदर्शनास आल्यामुळेच ही दरवाढ करण्यात आल्याचे प्राणिसंग्रहालयाचे संचालक डॉ. संजय त्रिपाठी यांनी सांगितले. मात्र परिसरातील दुकानदारांच्या घुसखोरीचा फटका आता पर्यटकांना बसणार आहे.

राणी बागेत चौकोनी कुटुंबाला १०० रुपये तिकीट असून लहान मुलास २५ रुपये, तर प्रौढ व्यक्तीस ५० रुपये तिकीट आहे. त्यात आता पार्किंगच्या ८० रुपयांची भर पडली. उद्यान व प्राणिसंग्रहालयाला लागून असलेल्या हेरिटेज भाऊ दाजी लाड संग्रहालयाच्या तिकीट दरातही आता वाढ करण्यात आली आहे. यामध्ये लहान मुलांसाठी असणारे ५ रुपयांचे तिकीट दहा रुपये तर प्रौढांसाठी असणारे दहा रुपयांचे तिकीट २० रुपये करण्यात आले आहे.

## आगीचा फटका! अमेरिकेतील ऑस्कर २०२५ सोहळा रद्द होणार?

कॅलिफोर्निया : कॅलिफोर्नियातील भयावह आगीत अनेक घरे, इमारती, झाडे जळून खाक झाली असून ही आग अद्यापही धुमसतच आहे. या आगीचे परिणाम स्थानिक लोकांपर्यंतच ते जगभरातील फिल्म इंडस्ट्रीला देखील होतो आहे. अशातच आता अकादमी पुरस्कार २०२५च्या आयोजनावरही या आगीचे परिणाम दिसून येत आहेत. या आगीमुळे ऑस्कर २०२५ सोहळा रद्द होण्याच्या मार्गावर आहे.

ऑस्कर हा मनोरंजन विश्वातील अतिशय प्रतिष्ठित असा अवॉर्ड आहे. पण, यंदाच्या ऑस्करवर अमेरिकेत लागलेल्या आगीचं संकट आहे. ही आग आटोक्यात आणण्यात प्रशासनाला अपयश येत आहे. त्यामुळेच २०२५ मध्ये होणारा ऑस्कर सोहळादेखील रद्द होऊ शकतो. ९६ वर्षांत अकादमी अवॉर्डस रद्द होण्याची ही पहिलीच वेळ असू शकते. या आगीमुळे ऑस्करचा नामांकन सोहळादेखील पुढे ढकलण्यात आला आहे. ऑस्कर २०२५च्या नामांकनांची घोषणा आधीच दोन वेळा पुढे ढकलण्यात आली आहे. ९७व्या अकादमी अवॉर्ड सोहळ्यातील नामांकांची घोषणा १७ जानेवारी २०२५ रोजी होण्याची अपेक्षा होती परंतु ते १९ आणि नंतर २३ जानेवारीपर्यंत वाढवण्यात आले. तर २ मार्चला ऑस्कर २०२५ सोहळा आयोजित केला गेला आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, अमेरिकेत लागलेल्या या आगीमुळे मात्र ऑस्कर बोर्ड कमिटी चिंतेत आहे. ऑस्कर सोहळा झाला तर लोक आगीच्या नुकसानीत असताना आपण सेलिब्रेट करतोय, असे वाटेल या चिंतेत सध्या ऑस्कर कमिटी बोर्ड आहे. जरी काही दिवसांत आग आटोक्यात आली तरी संपूर्ण शहरावर याच्या जखमा आहेत आणि यातून बाहेर पडायला लोकांना वेळ लागेल. त्यामुळेच जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा सपोर्ट करून आर्थिक निधी प्राप्त करून देत सहाय्य करण्यावर कमिटीचा भर असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## सैफ अली खानची प्रकृती स्थिर, दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वी



मुंबई : चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेला बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याची प्रकृती आता स्थिर आहे. सैफवर लिलावती रुग्णालयात दोन यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्याच्या कंबरेजवळच्या मणक्यातील भागातून सुमारे अडीच इंचाचा चाकुचा भाग बाहेर काढण्यात आला आहे. सध्या सैफ अली खान विश्रांती घेत आहे. डॉक्टरांच्या देखरेखीत त्याच्यावर उपचार सुरू आहेत. आणखी काही दिवस सैफला रुग्णालयात उपचार घ्यावे लागण्याची शक्यता आहे.

अभिनेता सैफ अली खान याच्यावर गुरुवारी १६ जानेवारी रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास चाकूने हल्ला झाला. या हल्ल्यात सैफच्या शरीरावर सहा मोठ्या जखमा झाल्या. यापैकी दोन जखमा गंभीर स्वरुपाच्या होत्या. गंभीर जखमी झालेल्या सैफ अली खानला त्याचा मोठा मुलगा इब्राहिम याने रुग्णालयात दाखल केले. सैफवर पहाटे पाचच्या सुमारास आणि सकाळी नऊच्या सुमारास अशा दोन शस्त्रक्रिया झाल्या. लिलावती रुग्णालयातील डॉ. निरज उत्तमानी आणि न्यूरोसर्जन डॉ. नितीन डांगे यांच्या नेतृत्वात सैफवर उपचार सुरू आहेत. चाकूने झालेल्या जखमांवर उपचार करण्यासाठी डाव्या हातावर आणि मानेवर प्लॅस्टिक सर्जरी करण्यात आली. डॉक्टर निना जैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेवेळी सैफवर लक्ष ठेवण्यासाठी कार्डियोलॉजिस्ट डॉक्टर श्रीनिवास गोडबोले उपस्थित होते. हाती आलेल्या माहितीनुसार सैफवर चाकू हल्ला करणारी व्यक्ती अद्याप फरार आहे. पोलीस या व्यक्तीचा शोध घेत आहेत. सैफच्या घरातील चार नोकरांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. यात एक महिला नोकर आहे. या महिला नोकराशी चाकू हल्ला करणाऱ्या व्यक्तीचा मध्यरात्री सैफच्या घरातील एका खोलीत वाद सुरू होता. या वादाचा आवाज ऐकून सैफ खोलीत आला. त्यावेळी संबंधित व्यक्तीने सैफवर चाकू हल्ला केला आणि घरातून पलायन केले. चाकू हल्ला करणाऱ्याने महिला नोकराच्या हातावर वार केला. तसेच अभिनेता सैफ अली खान याच्यावर सहा वार केले. यामुळे सैफच्या शरीरावर सहा मोठ्या जखमा झाल्या. यापैकी दोन जखमा गंभीर स्वरुपाच्या होत्या. महिला नौकरही चाकू हल्ल्यात जखमी झाली पण तिच्या जखमांचे स्वरुप जास्त गंभीर नव्हते.

## म्हणून हिंडेनबर्गचे दुकान बंद

नवी दिल्ली : अमेरिकेचे ४७ वे अध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प २० जानेवारी रोजी शपथ घेणार आहेत. हा शपथविधी जवळ येताच नॅथन अँडरसन यांनी हिंडनबर्ग रिसर्च ही संस्था बंद करत असल्याचे जाहीर केले. हिंडनबर्ग रिसर्च याच संस्थेचे अहवाल दाखवत विरोधी पक्षनेते राहुल गांधी लोकसभेत उद्योगपती गौतम अदानी आणि केंद्र सरकारवर आरोप करत होते. आता ही संस्थाच बंद होत आहे. ज्या हेतूने संस्था सुरू केली होती तो साध्य झाला म्हणून आता संस्था बंद करत आहे, एवढे सांगत नॅथन अँडरसन यांनी हिंडनबर्ग रिसर्च ही संस्था बंद करत असल्याचे जाहीर केले. पण नेमका हेतू काय होता हे जाहीर करणे टाळले.

आरोग्याशी संबंधित कोणतेही कारण नाही. आर्थिक किंवा इतर कोणतेही कारण नाही. हा एक वैयक्तिक निर्णय आहे. ज्याने संस्था सुरू केली त्याचाच हा निर्णय आहे, अशा स्वरुपाची वाक्यरचना करत सोशल मीडियावर व्यक्त होत नॅथन अँडरसन यांनी हिंडनबर्ग रिसर्च बंद करत असल्याचे जाहीर केले.

हिंडनबर्ग रिसर्च ही संस्था ठरवून निवडक कंपन्यांची बदनामी करते. ही बदनामी करण्यासाठी आर्थिक पाहणी आणि अभ्यास केल्याचे सांगत अहवाल सादर करते; असा आरोप काही अभ्यासक करत होते. शेअर बाजारात ठरवून झटपट नफा कमावण्यासाठी काही जण व्यवहार करतात. या व्यवहारांचे आणि हिंडनबर्ग रिसर्चच्या अहवालांचा परस्पर संबंध आहे, असाही आरोप काही अभ्यासक करत होते. या आरोपांबाबत काही बोलणे टाळून नॅथन अँडरसन यांनी हिंडनबर्ग रिसर्च ही संस्था बंद करत असल्याचे जाहीर केले. आता हिंडनबर्ग रिसर्च ही संस्था बंद झाल्यामुळे राहुल गांधी काय करणार, कोणाचे अहवाल आरोप करण्यासाठी आधार म्हणून वापरणार यावरूनही चर्चेला उधाण आले आहे. काँग्रेस मुख्यालयाचे कोटला मार्ग येथे स्थलांतर झाले. या नव्या मुख्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी राहुल गांधी यांनी केलेले भाषण वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. आपली लढाई आरएसएस, भाजपा आणि भारताच्या विरोधात असल्याचे राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधींचे वक्तव्य वादाच्या भोवऱ्यात सापडले आणि हिंडनबर्ग रिसर्च ही संस्था बंद होत असल्याची बातमी आली आहे.

## एमएमआरडीएची मेट्रो मार्ग ९, ७ अ यास नवीन मुदतवाढ!

मुंबई : एमएमआरडीएच्या मेट्रो प्रकल्पांमध्ये विलंब होत असल्याचे दिसून आले असून, मेट्रो मार्ग ९ (दहिसर पूर्व ते मिरा भाईंदर) आणि मेट्रो मार्ग ७ अ (अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय टर्मिनल) यांसाठी नव्या मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन्ही मेट्रो मार्गांचे कार्यादेश ९ सप्टेंबर २०१९ रोजी जारी करण्यात आले होते. मात्र, विविध अडचणींमुळे प्रकल्प पूर्ण होण्यात विलंब होत आहे. त्यामुळे या मार्गांवरील नागरिकांना मेट्रो सुविधेसाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेकडे या प्रकल्पांबाबत माहिती विचारली होती. त्यास उत्तर देताना कार्यकारी अभियंता सचिन कोठावळे यांनी ही माहिती प्रदान केली. एमएमआरडीएची मेट्रो मार्ग ९ आणि ७ अ यास नवीन मुदतवाढ दिली गेली असून मेट्रो मार्ग ९ साठी जून २०२५ तर मेट्रो मार्ग ७ अ साठी जुलै २०२६ अशी नवीन डेडलाईन दिली असल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांस मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखेने दिली आहे. मेट्रो मार्ग ९ जो दहिसर पूर्व ते मिरा भाईदर पर्यंत आहे आणि मेट्रो मार्ग ७ अ जो अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय टर्मिनल पर्यंत आहे.

## दिल्लीच्या प्रचारात 'एआय' ठरतेय डोकेदुखी!

### निवडणूक आयोगातर्फे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) संदर्भात सूचना जारी

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय'चा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणुकीत एआयच्या गैरवापराबद्दल सतत चिंता व्यक्त केली आहे. यामुळे दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) संदर्भात महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत. यामध्ये राजकीय पक्षांना निवडणूक प्रचारात जबाबदारी आणि पारदर्शकतेसह कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्यास सांगण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाने आज, गुरुवारी जारी केलेल्या निवेदनानुसार, राजकीय पक्ष आणि उमेदवारांना सल्ला दिला आहे की, राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी एआय वापरून प्रसिद्ध केलेली सामग्री योग्यरित्या उघड करावी.

उमेदवार आणि राजकीय पक्षांना जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये, निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, जर कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवार कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे (एआय) तयार केलेला कोणताही फोटो, व्हिडिओ किंवा इतर साहित्य वापरत असेल तर त्याचा स्रोत उघड करणे आवश्यक आहे. जर राजकीय पक्ष त्यांच्या जाहिराती आणि प्रचारात्मक साहित्यात कृत्रिम सामग्री वापरत असतील तर त्यांना अस्वीकरण द्यावे लागेल, असे आयोगाने म्हटले आहे.

गेल्या ७ जानेवारी रोजी दिल्ली विधानसभा निवडणुकांची घोषणा करताना मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी म्हटले होते की, चुकीची माहिती पसरवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाला सतर्क राहावे लागेल. तसेच, अशी माहिती थांबवण्यासाठी जलद कारवाई करावी लागेल. यापूर्वी २०२४च्या लोकसभा निवडणुकीदरम्यानही आयोगाने सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर करण्याच्या सूचना जारी केल्या होत्या.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत डीपफेक आणि दिशाभूल करणारे संदेश पसरवण्याचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. अलिकडेच, पक्षाच्या अधिकृत एक्स हँडलवर पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांचे एआय-जनरेटेड फोटो आणि व्हिडिओ पोस्ट केल्याबद्दल पोलिसांनी आप विरुद्ध ५ एफआयआर नोंदवले आहेत. या तक्रारी १० आणि १३ जानेवारी रोजी पोस्ट केलेल्या व्हिडिओंशी संबंधित होत्या, त्यापैकी एका व्हिडिओमध्ये ९०च्या दशकातील एका बॉलिवूड चित्रपटातील दृश्यात भाजपा नेत्यांचे चित्रण करण्यासाठी एआय-डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला होता.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाला मंजुरी!

नवी दिल्ली : केंद्र सरकार प्रत्येक १० वर्षांनी वेतन आयोग आणत असतो. सध्या देशात सातवा वेतन आयोग आहे. तर गेल्या अनेक दिवसांपासून सरकारी कर्मचाऱ्यांच्या मनात आठवा वेतन आयोग कधी लागू होणार असा प्रश्न पडत होता. त्यानंतर आता केंद्रिय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली आहे. याबाबतची माहिती आज केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. ८वा वेतन आयोगामुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनात मोठी वाढ होणार आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभमीवर केंद्र सरकारने ही मोठी घोषणा केली आहे. केंद्र सरकार प्रत्येक १० वर्षांनी वेतन आयोग आणत असतो. सध्या देशात सातवा वेतन आयोग आहे. याचा कार्यकाल २०२६ ला संपत आहे. त्याअगोदर अध्यक्ष आणि २ सदस्यांची नियुक्ती केली जाईल. त्यानंतर २०२६ पर्यंत आठव्या वेतन आयोगाची स्थापना केली जाईल, असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही घोषणा करताना सांगितले. तसेच सध्या सातव्या वेतन आयोगाच्या ज्या काही शिफारशी आहेत त्या आधीच लागू केल्या आहेत. सरकार नंतर आठव्या वेतन आयोगाच्या सदस्यांसह इतर तपशीलांची माहिती देईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

## १० व्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन संपन्न

## अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने मराठवाड्यातील तरुणाईला सिने साक्षर केले : पद्मभूषण सई परांजपे

### १० व्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला दिमाखात सुरूवात, पद्मभूषण सई परांजपे यांना पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार प्रदान




छत्रपती संभाजीनगर, दि. १५ : सांस्कृतिक आणि कला विषयक उपक्रम केवळ पुणे - मुंबईतच घडू शकतात असे नाही, हे अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने दाखवून दिले आहे. विशेषत : मराठवाड्यातील तरुणाईला सिने साक्षर करण्याचे काम या महोत्सवाने केले असल्याचे प्रतिपादन पद्मभूषण सई परांजपे यांनी यावेळी केले.

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन आज एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार प्रसिध्द व ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या व चित्रपट दिग्दर्शिका पद्मभूषण सई परांजपे यांना त्यांच्या भारतीय सिनेमातील अतुल्य योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पैठणीचा शेला, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि २ लक्ष रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी, पद्मभूषण सई परांजपे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी, महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, महोत्सवाचे मानद अध्यक्ष व प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, फ्रिप्रेसी ज्यूरी चेअरपर्सन लतिका पाडगांवकर, अभिनेत्री सीमा बिस्वास, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना पद्मभूषण सई परांजपे म्हणाल्या, आज इथे बोलत असताना नित्याचं साचेबंद वक्तव्य टाळून मी एवढेच म्हणते की, आजवर मी केलेल्या कामाची उशिरा का होईना पण दखल घेतली आणि आज मला हा मोठा आणि सुंदर असा 'पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार' सन्मान देऊन केला, त्याचा मी अतिशय आनंदाने आणि नम्रपणे स्वीकार करते. अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव एका वेगळ्या धारणेने सुरू झालेला असून मराठवाड्यामधल्या रसिकाला खास आपला वाटेल असा हा उत्सव आहे.

आनंदाची गोष्ट अशी की गेल्या वीस वर्षामध्ये मराठी सिनेमाला उभारी आली असून आज वर्षाला किमान ५०-६० मराठी चित्रपट जन्माला येतात. आणि विशेष म्हणजे त्यातील अनेक सिनेमे शहरी संस्कृतीपासून दूर असलेल्या मातीमधून निपजतात. होतकरू दिग्दर्शकाला वाटणारी तळमळ, खाजगी व्यथा, सामाजिक पोटतिडीक अशा जाणिवामधून यातल्या बऱ्याच सिनेमांचा जन्म होतो. त्यातले काहीतरी तांत्रिकदृष्ट्या थोडे कच्चे असले तरी आशयाला पक्के असल्यामुळे हे सिनेमे थेट भिडतात. पण या सिनेमंडीमधून नानाविध विषयांना वाचा फुटली असल्याचे पद्मभूषण सई परांजपे म्हणाल्या.

यावेळी अपर मुख्य सचिव विकास खारगे म्हणाले, चित्रपट हे महत्त्वपूर्ण क्षेत्र असून भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सॉफ्ट पॉवर म्हणून सिनेमा काम करत असतो. महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव होत आहेत, ही निश्चितपणे आनंदाची बाब आहे. या माध्यमातून आपल्याला भारतीय सिनेमासह आंतरराष्ट्रीय चित्रपट पाहता येतात. अशा महोत्सवात सेलिब्रेटी, क्रिएटिव्हिटी आणि कॉमर्स हे तीन सी यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असतात. चित्रपट बनविणाऱ्या मंडळींना महाराष्ट्र शासन कायम सहकार्य करीत आले असून अनेक प्रोत्साहानपर योजना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दरवर्षी मराठी सिनेमाला महाराष्ट्र शासनाच्यावतीने १०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते.

एका छोट्या शहरात सुरू झालेला हा महोत्सव आज देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. हा एकमेव असा महोत्सव असेल ज्यामधे दिग्दर्शक आयोजकांच्या भूमिकेत आहेत. हा महोत्सव रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन करत त्यांना शिक्षित करत प्रेरणा देण्याचे काम करत असल्याचे महोत्सवाचे मानद अध्यक्ष व प्रसिध्द दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी सांगितले.

महोत्सव संचालक सुनील सुकथनकर यावेळी बोलताना म्हणाले, मी अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा महोत्सवात ज्युरी म्हणून या अगोदर सहभागी झालो होतो. मात्र, आता महोत्सवाच्या संचालक म्हणून काम करीत असताना मनापासून आनंद होतोय. मानवतेच्या प्रवासाच्या गोष्टी सिनेमाच्या सहाय्याने सांगण्याचा प्रयत्न या महोत्सावाच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत.

या भागाचा भूमिपुत्र म्हणून या महोत्सव या भागात होतोय याचा मला अभिमान आहे. हे महोत्सवाचे दशकपूर्तीचे वर्ष आहे. याच महोत्सवातून एमजीएम फिल्म स्कूलची निर्मिती झालेली आहे. भारतातील महत्त्वपूर्ण १० चित्रपट महोत्सवातील हा एक वरच्या क्रमाचा हा महोत्सव आहे. हा महोत्सव केवळ या भागापुरता मर्यादित न राहता हा महोत्सव देशपातळीवर पोहचला असल्याचे महोत्सवाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी बोलताना संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल म्हणाले, देशभरातून आलेल्या सर्व रसिक प्रेक्षकांचे मी या दहाव्या महोत्सवात मनापासून स्वागत करतो. हा महोत्सव म्हणजे आता शहराची ओळख झाली आहे. या महोत्सवास ५ दिग्दर्शकाचे मार्गदर्शन लाभले आहे. या भागातील प्रतिभावंत कलाकारांना एक व्यासपीठ या महोत्सवाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे.

उद्घाटन सोहळा संपन्न झाल्यानंतर पिव्हीआर -आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे यावर्षीची जागतिक पातळीवरील नावाजलेली फ्रेंच आणि तामिळ भाषेतील फिल्म 'लिटील जाफना' ही फेस्टिव्हलची ओपनिंग फिल्म म्हणून प्रदर्शित करण्यात आली.

रसिक प्रेक्षकांनी प्रत्यक्षपणे अनुभवला शतकापूर्वीचा कालिया मर्दन मूकपट

भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिध्द मुकपट कालिया मर्दन याचे विशेष प्रदर्शन उद्घाटन सोहळ्याआधी दाखविण्यात आला. शंभर वर्षांपूर्वीचा मुकपट प्रत्यक्ष संगीताद्वारे रसिकांना अनुभवता यावा म्हणून कालिया मर्दन हा मुकपट कोलकाता येथील सतब्दीर सब्द या वाद्यवृंद समूहातर्फे सादरीकरणाद्वारे दाखविला गेला. या समूहामध्ये सात्यकी बॅनर्जी, सुचल चक्रवर्ती, तीर्थंकर बॅनर्जी, सुमंत्र गुहा, सौमाल्य सरेश्वरी, अरुणभा गुप्ता, दिव्यकमल मित्र आणि स्वरूप मुखर्जी आदि कलाकारांचा समावेश होता.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महानगर पालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकणार -आ.खोतकर

## शिवसेनेच्या कार्यकर्ता बैठकीमध्ये अर्जुन खोतकर यांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना महानगर पालिकेवर शिवसेनेचा महापौर करायचा आहे त्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे प्रतिपादन जालना शिवसेनेच्या कार्यकर्त्याच्या बैठकींत बोलताना केले.

जालना शहरातील भाग्यनगर येथे आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी बोलताना कार्यकर्त्यांनी विधानसभेच्या विजयामुळे हुरळून न जाता पुन्हा नव्याने जोमाने महान- गरपालिकेच्या निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागावे शासनाच्या योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत. महायुतीच्या शासनामध्ये लहानापासून थोरांपर्यंत असंख्य योजना शासनाने राबवल्या असून विधानसभा क्षेत्रातील शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम



करावे व येणाऱ्या निवडणुकीला सामोरे जावे पक्ष संघटनेच्या दृष्टीने शिवसेना पक्षाच्या वार्डामध्ये शाखा उघडाव्यात असे प्रतिपादन अर्जुन खोतकर यांनी बोलताना केले. या यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर , शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले , फेरोजलाला तांबोळी , गणेश सुपारकर ,महेश दुसाने ,निखिल पगारे ,राहुल हिवराळे , गोपीकिशन गोगडे ,शिवसेना महिला आघाडीच्या संपर्क प्रमुख सविता किवंडे ,युवासेनेचे शुभम टेकाळे पाटील , दीपक वैद्य ,किरण गरड , आशा कोळी ,कोमल शिंदे सुशील, भावसार,किशोर शिंदे ,राम सत्तकर ,किरण शिरसाट , संतोष जांगडे , जावेद जफर ,मुसा परसुवाले ,इम्रान पठाण संदीप साबळे ,बाबा कुरेशी ,राज रत्नपारखे विक्रम कुसुंदर ,पिंटू खंदारे, दीपक राठोड , भगवान पुराणिक ,रवींद्र देशपांडे ,आंभोरे संतोष रासवे ,अंबादास चितेकर, रामभाऊ सत्कार ,श्याम गोगडे ,ज्ञा- नेश्वर सुपारकर किरण कोकाटे ,शुभम देशमुख ,गौरव नवगिरे ,संजय कुबेर ,संतोष परळकर दसरत तोंडुळे ,स्वप्नील हिवाळे ,शरद ढाकणे ,आकाश जगताप ,केतन नवलख सय्यद इरफान, महेश मंचेवार, गोविंद सोनवणे ,दिनेश सुरवसे , लखन कणसे प्रदीप गायकवाड ,राजू गायकवाड, भूषण साबळे ,सचिन सांबरे ,सागर राजपूत ,शेख जान शेख , जावेद पठाण ,चंद्रसेना निर्माळ ,भोला काबळे पांडुरंग खैरे ,राम भुतेकर ,यासह आजी माजी नगरसेवकासह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## संक्षिप्त



### विदेशी दारूसह कार जप्त; मंठा पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

तळणी रोडवरील दुधा पाटी जवळ विदेशी दारूचे बॉक्स घेऊन जात असलेली एक कार मंठा पोलिसांनी पकडली या कार्यवाहीत ३८ हजार ४०० रुपयांची विदेशी दारू व दीड लाख रुपयांची कार पोलिसांनी जप्त केली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार , मंठा ते तळणी रोडवरील दुधा पाटीजवळ विदेशी दारूच्या बाटल्या विनापरवाना बेकायदेशीररित्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात व कब्जात बाळगून एमएच २३ इ ३५९५ या क्रमांकाच्या कारमधून घेऊन जात असतांना मंठा पोलिस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या पथकाकडून सदर कार्यवाही करण्यात आली. सदर कार्यवाही वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती , पोलीस हेड कॉन्स्टेबल आनंद ढवळे , सचिन जाधव , श्रीकांत काळे, मंगेश चौरे, मनोज काळे,ब्रम्हानंद जायभाय , तुळशीराम बिजुले यांचा पथकात समावेश आहे.

### दुसरे आचार्य भानुकवी महानुभाव मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ.अविनाश आवलगावकर



**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**

आचार्य भानुकवी महानुभाव संप्रदायातील १९७० च्या दशकातील एक महत्त्वाचे कवी होते. पाच कविता संग्रह, कटाव, पोवाडे, सामाजिक प्रबोधनात्मक रचना अशा विविध प्रकारच्या साहित्यात त्यांनी भर घातलेली आहे. यावर्षी आचार्य भानूकवी यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांच्या साहित्य कार्याला उजाळा मिळावा म्हणून या साहित्य संमेलनाचे आयोजन केल्या जात आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई पुरस्कृत संपन्न होणारे दुसरे आचार्य भानुकवी महानुभाव मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांची निवड सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. डॉ. आवलगावकर यांचे मराठी आणि महानुभाव साहित्यात विशेष असे कार्य आहे. या साहित्य संमेलनाच्या यशस्वीतेकरिता महानुभाव साहित्य प्रतिष्ठानकडून पूर्वतयारी करण्यात येत आहे, असे संमेलनाचे कार्यवाह अध्यक्ष प्रा.भारतभूषण शास्त्री यांनी कळविले आहे. डॉ.राजेंद्र राऊत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत सर्वानुमते डॉ. आवलगावकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. या समितीत डॉ. कोमल ठाकरे, डॉ. राम रौनेकर, डॉ.मारोती घुगे, डॉ. कानुलाल विठोरे, श्री.अशोक डोरले, प्रा.दीपक राखुन्डे, डॉ.अण्णा वैद्य, डॉ.गो- विंदशास्त्री शिंदे, डॉ.राष्ट्रपाल मेश्राम, डॉ. प्रवीण बनसोड, डॉ. किरण वाघमारे, डॉ. विद्या दिवटे, महंत दिवाकर बाबा, म. गोंदेकर बाबा, म.कल्याणराज वाकीकर, श्री.चक्रपाणी कवीश्वर, आनंदराव गजभिये, विजय जाधव, नारायण खरात, राजकुमार शेंडे, डॉ. बळवंत भोयर, तृषाल रामटेके आदींचा समावेश होता.

### परतूरला अंधांसाठी आजपासून तीन दिवसीय स्वयंसिद्धता, सहसंवेदना सजगता कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

येथील लुई ब्रेल शिक्षण संस्थेच्या वतीने अंधांसाठी तसेच डोळस कार्यकर्त्यांसाठी दि. १७ व १८ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवसीय स्वयंसिद्धता आणि सहसंवेदना सजगता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती लुई ब्रेल शिक्षण संस्थेचे संस्थापक शंकर राखुंडे यांनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना राखुंडे यांनी सांगितले की,अंध व्यक्तींना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करून त्यांना आपले आयुष्य सुलभ आणि सुकरतेने जगता यावं यासाठी आतापर्यंत राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये आयोजित केलेल्या ६४ आणि मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील एक अशा ६५ स्वयंसिद्धता कार्यशाळा सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींना अत्यंत उपयुक्त ठरल्या आहेत. मराठवाड्यातील अनेक अंध व्यक्तींच्या मागणीवरून चौथ्यांदा ही कार्यशाळा परतूरमध्ये होत आहे. या कार्यशाळेत पांढऱ्या काठीची माहिती व उपयोग, पांढरी काठी शास्त्रशुद्ध पद्धतीने वापरण्याचे प्रशिक्षण देऊन प्रत्यक्ष वापर करण्याचा सराव, इतर ज्ञानेंद्रियांचा वापर सक्षमतेने कसा करायचा याबद्दलची माहिती व प्रशिक्षण, स्पर्शज्ञानाने विविध पदार्थ कसे ओळखायचे हे सर्व प्रशिक्षण देऊन प्रशिक्षणार्थ्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकारणही करण्यात येणार आहे. हे सर्व प्रशिक्षण स्वतः स्वागत थोरात देणार आहेत. तर स्वरूपा देशपांडे या कार्यशाळेच्या समन्वयक व सहाय्यक प्रशिक्षक आहेत. ही कार्यशाळा निवासी असून प्रशिक्षणार्थ्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. कार्यशाळेची वेळ दोन्ही दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ अशी असेल. अंधांच्या वैयक्तिक जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणणाऱ्या या स्वयंसिद्धता कार्यशाळेत सहभागी होण्याची संधी अंधांनी चुकवू नये व लवकरात लवकर आपले नाव नोंदवावे असे आवाहन शंकर राखुंडे यांनी केले आहे. नेत्रहीनांसाठी उपयुक्त अशा या कार्यशाळेबद्दल आधिक माहितीसाठी ९९२३९२१८७१ या मोबाईल क्रमांकावर शंकर राखुंडे यांच्याशी किंवा ९८८१५२१९१५ या मोबाईल क्रमांकावर हनुमान चिपाडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## इन्नरव्हील क्लब होरायझनने बालगृहातील मुलांना दिला प्रेरणादायी चित्रपटाचा आनंद

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आई-वडिलांचे प्रेम, आपलेपणाचा ओलावा आणि बालपणीचे स्वप्न यापासून दूर असलेल्या मुलांसाठी इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनने एक हृदयस्पर्शी उपक्रम राबवला. समाज कल्याण विभागाच्या मुलींच्या निवासी शाळेतील मुली, दहिफळ तांडा येथील वसंतराव नाईक बालगृह आणि जालना येथील शासकीय निरीक्षणगृहातील मुलांसाठी नि:शुल्क 'मुफासा : द लायन किंग' या प्रेरणादायी चित्रपटाचा विशेष चॅरिटी शो आयोजित करण्यात आला होता.

या उपक्रमामाचा उद्देश केवळ मनोरंजन नव्हता तर जीवनातील कठीण परिस्थितीवर कशी मात करावी, आत्मविश्वास आणि धैर्याने कसे उभे राहावे, याचा संदेश मुलांना देणे हा होता. डिजनीच्या या चित्रपटाने एका वेगळ्या जगाची सैर घडवली. सिनेमागृहातील मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आलेल्या या चित्रपटाने मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू फुलविण्याबरोबरच त्यांच्या मनात जिद्द आणि प्रेरणेची नवी पालवी रुजवली.

कमलबाबू झुनझूनवाला, अजित मंत्री आणि रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्ष करण अग्रवाल यांच्या सहकार्याने इन्नरव्हील क्लब ऑफ होरायझनच्या प्रयत्नांतून हा चॅरिटी उपक्रम



राबविण्यात आला. क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत, सचिव ड. पिंकी लड्डा, प्रकल्प प्रमुख सीमा गेही, प्रिया शाह यांच्यासह नेत्रा भक्कड, दिपाली पाटणी, अनुजा जाधव, सोनल थाराणी, पायल अग्रवाल, पूजा राठी, सुरक्षा गेही अनुराधा जैन, आशा अग्रवाल यांनी या मुलांसमवेत चित्रपटाचा आनंद लुटला.

उपक्रमाचा उद्देश विषद करताना ड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, क्लबने संपूर्ण एक शो बुक केला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून संकलित झालेला निधी एखाद्या शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रदान केला जाणार आहे. ही मुलं जीवनाच्या कठीण वाटांवर चालत असलीतरी त्यांच्या मनातील आशा आणि जिद्द कायम आहे. 'मुफासा: द लायन किंग' या चित्रपटाद्वारे आम्ही त्यांना नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि जबाबदारीचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या छोट्याशा प्रयत्नातून जर त्यांच्या मनाला प्रेरणा मिळाली, तर त्यासारखी आनंदाची गोष्ट दुसरी नाही. चित्रपट पाहून भावूक आणि आनंदी झालेली मुलं म्हणाले की आज आम्हाला खूप वेगळा अनुभव मिळाला. हा चित्रपट आम्हाला खूप काही शिकवून गेला. आम्हालाही मोठं होऊन आपलं जीवन सुंदर बनवायचं आहे. या उपक्रमाने केवळ मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला नाही तर त्यांच्या मनात स्वप्न बघण्याची उमेद जागवली. इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनने या मुलांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण आणि प्रेरणेचा नवा अध्याय लिहून खऱ्या अर्थाने समाजसेवेचे दर्शन घडवले.

## शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला मा.खासदार पुंडलिकराव दानवे यांचे नाव

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



भोकरदन येथिल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व माजी खासदार यांचे नावाने स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदन, जि. जालना असे नामकरण शासनाने जाहीर केले,

राज्य शासनाने १५ जानेवारी २०२५ रोजी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्यामार्फत शासन निर्णय काढत राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नाव बदलण्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये भोकरदन येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय, खढ्ढख कॉलेज) ला राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व तथा थोर स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरि दानवे यांचे नाव देण्यात आले. राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंतर्गत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत या संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. अशा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा मुख्य उद्देश हा युवकांना रोजगारभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे व खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळांचा पुरवठा करणे असा असून या महत्त्वपूर्ण औद्योगिक प्रशिक्षण संस्था ला स्वातंत्र्य सेनानी माजी खासदार पुंडलिक हरी दानवे यांचे नाव देऊन एकप्रकारे त्यांचा सन्मान केला आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मराठवाड्याला हैद्राबादच्या निजामशाही विरोधात दीर्घकाळ लढा द्यावा लागला . मराठवाडा मुक्ती संग्रामचे हे आंदोलन सतत १३ महिने सुरु होते. या आंदोलनात अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. अखेर १७ सप्टेंबर, १९४८ रोजी निजामाच्या जोखडातून मराठवाडा मुक्त होवून भारतीय संघ राज्यात विलीन झाला. या मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यामध्ये स्वातंत्र्य सैनिक पुंडलिक हरी दानवे यांचे योगदान महत्वाचे आहे. स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन या नावामुळे त्यांचा व त्यांच्या मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यातील कार्याचा नेहमीच सन्मान करण्यात येईल. शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन व विभागीय कार्यालय यांनी स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन या नावाची शासन दरबारी शिफारस केल्याबद्दल तसेच प्रशासनाने या नावास मान्यता दिल्याबद्दल त्यांचे मन:पुर्वक धन्यवाद व खुप खुप आभार!


## जवाहर नवोदय विद्यालयाची प्रवेश परीक्षा नियोजनबध्द व शिस्तीत पार पाडावी -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

केंद्रीय परीक्षा एजन्सीदमार्फत आयोजित पी. एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेकरीता जालना जिल्ह्या तील ३० केंद्रावर एकुण ९ हजार ७६० विद्यार्थ्या ची शनिवार, दि. १८ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेच्या कालावधीत परीक्षा आयोजित करण्यादत आलेली आहे. सदरील प्रवेश परिक्षा नियोजनबध्द व शिस्तीत काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

केंद्रीय परीक्षा एजन्सीसमार्फत आयोजित पी. एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्यार पुर्वनियोजनाच्या अनुषंगाने आज (दि.१५) रोजी जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष तथा जिल्होाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्यान अध्यंक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी बैठकीस अपर जिल्हा धिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल घुपे, जवाहर नवोदय विद्यालय प्राचार्य श्री. पवार, उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत, परीक्षा समन्वणयक श्री. आंधळे यांच्यासह सर्व गटशिक्षण अधिकारी, परीक्षा केंद्रप्रमुख आणि केंद्र परीक्षा निरीक्षकांची उप- स्थिती होती.

सदरील केंद्रावर पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्ता ठेवण्यारत येणार आहे. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या



विद्यार्थ्याची कसुन तपासणी होणार असून, सदरील परीक्षेदरम्यारन कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये, याकरीता उपविभागीय अधिकारी , तहसिलदार, नायब तहसिलदार यांचे भरारी पथक स्थानपन करण्यापत आले आहे. जिल्ह्यातील प्रत्यीक परीक्षा केंद्रावर मंडळ अधिकारी, तलाठी यांचे बैठे पथक देखील स्था पन करण्या त आले आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्योही प्रकारचे इलेक्ट्रॉ निक डिव्हाईस, मोबाईल, स्माथर्टवॉच, कॅल्क्ययुलेटर, हेडफोन, मायक्रोफोन, हीडन कॅमेरा इत्यालदी इलेक्ट्रॉनिक्स साहित्य वापरण्याहस सक्त, मनाई करण्या त आलेली आहे. परीक्षा केंद्रावर नियुक्त करण्यांत येणारे पर्यवेक्षक, समवेक्षक हे इतर तालुक्याहतील असणार आहेत. तसेच पर्यवेक्षक व समवेक्षक यांना देखील मोबाईल अथवा इतर इलेक्ट्रॉ निक डिव्हाईस सोबत बाळगण्योस सक्तत मनाई करण्याकत आलेली आहे. तसेच परीक्षेदरम्याणन काही अनुचित प्रकार करणाऱ्या किंवा मदत करणाऱ्या विरुध्द भारतीय नागरिक संहिता २०२३ अन्वआये गुन्हाई दाखल करण्याणत येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले.

## इंधनाची बचत होण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत -माधुरी देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

इंधन बचत ही काळाची गरज असून चालक, वाहक, यांत्रिक विभागाचे कर्मचारी यांनी इंधन बचत कशी होईल यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन आगारप्रमुख माधुरी देशमुख यांनी केले.दरम्यान, इंधन बचतीसाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना बाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

येथील बस आगारात गुरुवारी (दि. १६) इंधन बचत मासिक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहून म्हणून पालक अधिकारी शामराव गायकवाड, महावीर ऑटोचे व्यवस्थापक बाळासाहेब चव्हाण, वाहतूक निरीक्षक सुरेखा साळवे, यांत्रिकी विभागाचे प्रमुख नाथराव ठेंगडे यांची उपस्थिती होती.दरम्यान, इंधन बचतीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या चालकांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. देशमुख पुढे म्हणाल्या की, इंधन ही नैसर्गिक संपत्ती आहे. त्यामुळे इंधनाचा वापर जपून करणे ही काळाची गरज आहे.आगारात कार्यरत असलेल्या चालक, वाहक, यांत्रिक विभागाचे कर्मचारी यांनी इंधन बचत होण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगतानाच इंधनाची कशा पद्धतीने बचत होऊ शकते याबाबत त्यांनी आवश्यक ती माहिती दिली.एका चालकाने दररोज एक लिटर इंधन बचत केले तरीही मोठ्या प्रमाणावर इंधन बचत होऊ शकते असे त्या म्हणाल्या.

दरम्यान, योग्य रीतीने बस चालवून इंधन बचत करण्यात मोलाची कामगिरी बजावल्याबद्दल आगारात कार्यरत असणारे चालक एफ. जी. शेख, सी. एस. माकोडे, एम. मोहसीन, अब्दुल रहीम, एम. ए. प्रधान, जी. के. घाटे, जी. एन. दराडे यांचा यावेळी पुष्प- गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आगारात ८ जानेवारी रोजी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना या कार्यक्रमाची प्रचार मोहीम राबविण्यात आली असून १५ फेब्रुवारी पर्यंत इंधन बचत मासिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. याप्रसंगी बाळासाहेब चव्हाण,नाथराव ठेंगडे, माकोडे यांचीही भाषणे झाली. आगाराचे वरिष्ठ लिपिक मधुकर गोडबोले यांनी सूत्रसंचालन केले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनेकांचा प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार गट) पक्षाच्या कार्यकर्त्या माजी नगरसेविका मणकर्णाताई डांगे, बदनापूर तालुक्यातील डावरगांव येथील सरपंच प्रभाकर तांबे, जालना शहरातील अँड. दिपक बलवंत नाईक व अँड. बाळकृष्ण गिते यांनी आज (दिनांक १५) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रवादीत प्रवेश केला. राष्ट्रवादी



काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे व माजीमंत्री आ. छगनराव भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली व जालना जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंद- राव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढे आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काम करणार असल्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.यावेळी माजी नगरसेविका सौ. मणकर्णाताई डांगे यांना राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग महिला जिल्हाध्यक्षपदी जबाबदारी देण्यात आली.

तसेच सरपंच प्रभाकर तांबे यांनाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जालना जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती देण्यात आली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, शहराध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, मराठवाडा कामगार आघाडीचे कार्याध्यक्ष सतीश वाहुळे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, कार्याध्यक्ष अमोल खरात, जिल्हा उपाध्यक्ष सचिन ईरछे, जालना विधानसभा अध्यक्ष प्रतापराव शिंदे,तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे,तालुका रायुकाँचे कार्याध्यक्ष समाधान राठोड, गोवर्धन डोंगरे ,कैलास चव्हाण ,सतीश डोंगरे ,रामेश्वर मदन, एन.जी मदन यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## पैठण तहसीलदार सारंग चव्हाण यांनी ग्रामीण रुग्णालय बिडकीनची केली पाहणी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १५ जानेवारी पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे पैठण तहसीलदार सारंग चव्हाण यांनी आज दि १५ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता अचानक भेट देऊन रुग्णालयामध्ये केली पाहणी, यावेळी तहसीलदार सारंग चव्हाण यांनी रुग्णालय मध्ये रुग्णांसाठी औषध उपचार, रुग्णालयातील मशिनरी, वार्डातील स्वच्छता, गरोदर महिलांची तपासणी विषयी माहिती, लहान बाळांना डोस, रुग्णवाहिका ,रुग्णालयामध्ये येणाऱ्या अडचणी विषय माहिती जाणून घेण्यात आली, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी तसेच डॉक्टर कर्मचारी त्यांना रुग्णांना चांगली सेवा उपलब्ध करून देण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ निकीता जोंधळे, वैद्यकीय अधिकारी डॉ प्रणिता मात्रे, तलाठी सचिन काशीकर, व पत्रकार बांधव, रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## नामविस्तार दिनानिमित्त शहिदांना अभिवादन



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१५, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त स्नेहनगर सिल्लोड येथे नामांतर लढ्यात शहीद झालेल्या शहिदांना अभिवादन करण्यात आले. त्यापूर्वी तथागत भगवान बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भागातील ज्येष्ठ महिला लीलाबाई दांडगे,लीलाबाई सुरडकर , पंचशिला आरके ,गोफने ताई , वंदना काळे, प्रमिला गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. आजच्या दिवशी विद्यापीठाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळाल्याने महिलांनी तीळ गुळ वाटून आनंद उत्सव साजरा केला. ह्या कार्यक्रमा साठी माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्रीमती निकम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## बिडकीन माजी जि प सदस्य विजय चव्हाण यांचा कार्यकर्त्यांसह भाजपामध्ये प्रवेश



बिडकीन दि १६ जानेवारी पैठण तालुक्यातील बिडकीन गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांनी मुंबई येथे दि १५ जानेवारी रोजी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार अनुराधाताई चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत बिडकीन सर्कल मधील असंख्य कार्यकर्त्यांसह पक्ष प्रवेश केला.यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस कल्याण गायकवाड,पैठण तालुका अध्यक्ष लक्ष्मण औटे, तुषार शिसोदे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष चंद्रकांत हुड, दत्ता बांडे, कामगार मोर्चा ता अध्यक्ष सुनील गडदे,मधुकर मरकड, सरपंच प्रभाकर निळ, भागवत ठाकुर, दिनेश तोतला,अविनाश राठोड, निकेश राऊत, निलेश धडे, अक्षय नरवडे, भारत दांडगे, विशाल पवार, पंडित चव्हाण, उत्तम राठोड, जगन्नाथ चव्हान, सुदाम राठोड, भाऊसाहेब चव्हाण, रोहित हाडे, राम देविदास, शुभम औटी,भाऊसाहेब राठोड, अजय राठोड आदींची उपस्थिती होती. भाजपा पक्ष वाढीसाठी मोठ्या जोमाने काम करणार असल्याचे विजय चव्हाण यांनी सांगितले तसेच संघटन व विकास कार्यासाठी विजय चव्हाण यांच्या पाठीशी आम्ही सर्व ठाम उभा असल्याचे प्रतिपादन रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

# डिजिटल साक्षरतेसह मूळ मानवी कौशल्य महत्त्वाचे - प्रकाश काळे

### संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिराला सुरुवात



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१६ जानेवारी

आजच्या काळात डिजिटल साक्षरता महत्त्वाची आहे. त्यासोबत मानवाचे वाचन,लेखन,मनन यासारखे मूळ कौशल्य ही महत्त्वाचे आहेत.आज आपण डिजिटल साक्षर होण्यासाठी प्रयत्न करत आहोत परंतु मानवी मूळ कौशल्य विसरत आहोत.यामुळे आपणास अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.असे मत अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाश काळे यांनी व्यक्त केले.ते संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,माळेगाव पिंपरी येथील सरपंच साधना राजपूत,उपसरपंच सुनिता जाधव,रवींद्र जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ जानेवारी ते २२ जानेवारी २०२५ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम शिबीर माळेगाव येथे आयोजित केले आहे.शिबिरामध्ये पुढील सात दिवस विविध वक्त्यांचे बौद्धिक सत्र,श्रमदान, आरोग्य शिबीर, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. पंकज गावित यांनी तर सूत्रसंचालन डॉ.निलेश गावडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ.प्रदिप गोल्हारे यांनी मानले.या शिबिरासाठी गजानन क्षीरसागर,कृष्णा राठोड, आकाश गव्हाड,वैभव ढगे,प्रीती काळे,वैष्णवी एलिस, दिप्ती सोनवणे,पूजा जाधव,शामल उंबरकर आदी विद्यार्थी स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.उद्घाटन कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक,विद्यार्थी स्वयंमसेवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सार्वजनिक शिवजयंतीच्या अध्यक्षपदी बाळासाहेब पठाडे



तभा वृत्तसेवा

पैठण दि १६ : पैठण तालुका सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या कार्यकारणी निवड बैठकीसाठी काल बुधवार रोजी सर्व शिवप्रेमींची छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर येथे बैठक आयोजित केली होती सदर बैठकीमध्ये एकमताने ठराव पारित करत सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब पठाडे यांची वर्णी लागली तसेच कार्याध्यक्षपदी अनिल राऊत स्वागत अध्यक्षपदी सिद्धार्थ परदेशी,साईनाथ कर्डिले उपाध्यक्षपदी अमोल भागवत, महेश पवार सचिव किशोर चौधरी नितीन देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली व सर्व शिवप्रेमींच्या वतीने नवनियुक्त कार्यकारणीचे अभिनंदन करण्यात आले. बैठकीसाठी माजी अध्यक्ष गणेश वाघमोडे आतिश गायकवाड शिवराज पारिख जालिंदर अडसूल हरिभाऊ दादा शेळके गणेश पवार नीरज पापुलवार किशोर सदावर्ते शहादेव लोहारे अमोल जाधव नामदेव खरात जनार्दन मिटकर माऊली वाघे सुभाष नवथर सतीश आहेर मनीष आवटे अंकुश काळे सुरज गोजरे राम भुकेले कपिल कवसांनकर ऋषी दहिभाते विजय जाधव राजू बोंबले आदी उपस्थित होते.

## अजिंठा लेणी येथील एकदिवसीय यात्रा संपन्न



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि १६ जगप्रसिद्ध अजिंठा लेणी च्या पायथ्याशी दरवर्षी प्रमाणे एकदिवसीय यात्रा भरली होती

यावेळी दरवर्षी प्रमाणे एकदिवसीय यात्रेचा बच्चे कंपनी मोठ्या प्रमाणात आनंद घेतला या यात्रेचे वैशिष्ट्य असे की हि यात्रा मकरसंक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी भरते या यात्रेत लहान मुलांची खेळणी रातपाळणा,मोटरगाडी झोका, उड्या मारण्याचा पाळणा अशी छोटी मोठी खेळणी आलेली असतात तसेच या यात्रेसाठी फर्दापूर,ठाणा,धनवट,वरखेडी अजिंठा,वाकोद जामनेर येथून हौसेने पालक लहान मुलांना घेऊन येतात तसेच या यात्रेत लहान मुलांची खेळणी,शेवचिवडा,दाळ्या फुटाणे,शेवड्या अशी खाद्यपदार्थ यांची दुकान थाटलेली असतात

यावेळी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने दुकानासाठी चांगल्याप्रकारे जागा उपलब्ध करून देण्यात आली होती तसेच फर्दापूर पोलिस स्टेशन चे पोलिस कर्मचारी हि बंदोबस्तात ठेवण्यात आले होते

## अंतरिक्ष पार्श्वनाथ भगवंताच्या गजरात जैन दिंडीचे शिरपूर नगरीत उत्साहात आगमन; १५० युवकांनी दिली सेवा


### येथील श्वेतांबर जैन मूर्तिपूजक श्रीसंघ यांच्या विद्यमाने तसेच श्री विमलनाथ स्वामी भगवान यांच्या कृपेने पदयात्राचे सांगता



छत्रपति संभाजीनगर : शिरपूर जैन येथील विश्व सुप्रसिद्ध श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ भगवंताच्या दर्शन पूजनासाठी विदर्भातील ऐतिहासिक नगरी असलेल्या लोणार येथून निघालेल्या पायदळ दिंडीचे मंगळवारी सकाळी शिरपूर जैन नगरीत धार्मिकमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत झाले.

छत्रपती संभाजीनगर येथील श्वेतांबर जैन मूर्तिपूजक श्रीसंघ यांच्या विद्यमाने तसेच श्री विमलनाथ स्वामी भगवान यांच्या कृपेने विश्व सुप्रसिद्ध असलेले विदर्भातील तीर्थक्षेत्र श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ भगवंताच्या दर्शनासाठी पदयात्रेत सहभागी झालेल्या ३२५ बंधू-भगिनींचे स्वागत करण्यात आले. यावेळी युगप्रधान आचार्यसम पंन्यास प्रवर श्री चंद्रशेखर विजयजी महाराज यांचे परम शिष्य मुनिराज श्री रत्नवल्लभ विजयजी महाराज, पंन्यास प्रवर श्री विमलहंस पदयात्रा दिंडीत सहभागी मान्यवर विजयजी महाराज, पंन्यास प्रवर श्री परमहंस विजयजी महाराज आदींनी दिंडीचे तसेच परमपूज्य मुनिराज श्री युगंधर महाराज आदी मुनींचे तसेच प. पू. साध्वीजी भगवंत सौम्यप्रज्ञाश्रीजी म. सा. आदी साध्वींचे स्वागत केले. यावेळी मोठ्या संख्येत श्रावक व श्राविका असा चतुर्विध संघ या पदयात्रेत सहभागी झाले. पदयात्रेत यात्रेकरूंच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वैद्यकीय चमूनेही सहभाग घेतला होता. या पदयात्रेचे आयोजन व नियोजनाची संपूर्ण जबाबदारी मातोश्री उमरावबेन कपूरचंद संचेती, विजयादेवी इंदरराज सिंघवी, विमलबाई बाबूलाल नाहर व भारतीबेन इंदरचंद संचेती यांच्या कुटुंबीयांनी घेतली आहे. लाभार्थी परिवारातर्फे इंदरचंद संचेती, अजय सिंघवी व मनोज नाहर यांच्यासह सल्लागार मंडळ, ट्रस्ट मंडळ व सर्व पदाधिकारी व सदस्यांनी पदयात्रेच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## संघ हीच जीवनगाथा



### अलक (१५) वरदहस्त

रा.स्व. संघाचे द्वितीय सरसंचालक होण्याआधी श्री गोळवलकर गुरुजींनी संन्यासी बनण्यासाठी श्री रामकृष्ण परमहंस यांचे प्रत्यक्ष शिष्य स्वामी अखंडानंद जी यांच्याकडून ब्रह्मचर्यची दीक्षा घेतली होती. आणि एक दिवस अचानक पूजनीय डॉक्टरांशी त्यांची भेट झाली. त्यांच्यातला संवाद असा

डॉक्टरः- आपण प्राध्यापक आहात ना.

गुरुजीः- नाही; आता नाही; आता मी संन्यासी आहे.

डॉक्टरः-मग आता काय करत आहात.

गुरुजीः- साधना

डॉक्टरः- कशासाठी

गुरुजीः-मोक्षासाठी

डॉक्टरः- चांगला विचार आहे पण आधी एका प्रश्नाचे उत्तर द्याल का.

गुरुजीः- हो नक्की.

डॉक्टरः-जर आज तुम्ही हजारो लोक नरककुंडात पडताहेत; असे पाहिले तर काय कराल.

गुरुजीः- आधी मी नरकात जाणाऱ्यांना वाचवेल त्यानंतर मोक्षाचा विचार करेल.

डॉक्टरः-तर मग आज भारत मातेची स्थिती अशीच आहे. स्वार्थी नरककुंडा सारखी. तिची चिंता कोणी करायची. तुम्ही मोक्ष सोडावा असे मला वाटते.

गुरुजीः-विचार करतो.

असे म्हणून ते परतले; पण नंतर दोघांचीही वारंवार भेट होऊ लागली आणि जसे गुरुदेव रामकृष्ण परमहंसांनी स्वामी विवेकानंदांवर वरदहस्त ठेवला होता; तसाच डॉक्टर हेडगेवार यांनी गुरुजींवर वरदहस्त ठेवला

(क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## जाहीर प्रगटन

मा. ए.आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.

दि. किरकोळ. अर्ज. नं. ३२५/२०२४. पुढील तारीख २०/०१/२०२५

अर्जदार : १. लजिना भ्र. महमद सय्यद, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नितीन नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. मोमीन महंमद सय्यद, वय ४१ वर्षे, धंदा मजुरी, रा. खातखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. निलम आरीफ अत्तार, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. नितीन नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. नय्युम महंमद सय्यद, वय ४० वर्षे, धंदा मजुरी, रा. चिंचोली लि. ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : १. महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद. २. शमीना भ्र. महंमद सय्यद, वय सज्ञान, धंदा घरकाम, रा. कनकावती नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. रिहान पिता महंमद सय्यद, वय सज्ञान, धंदा शिक्षण, रा. कनकाती नगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डी.एफ. म्हस्के यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ व ३ यांची आई असून अर्जदार क्र. ४ हा सावत्र भाऊ आहे. तसेच गैरअर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ ची सवत असून अर्जदार क्र. २ व ३ यांची सावत्र आई आहे. तसेच अर्जदार क्र. ४ ची सावत्र आई आहे. तसेच गैरअर्जदार क्र. ३ हा गैरअर्जदार क्र. २ हिचा मुलगा असून अर्जदार क्र. १ हिचा सावत्र मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. २ ते ४ हे यांचा सावत्र भाऊ आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ४ व गैरअर्जदार क्र. २ यांचे वडील नामे महंमद इसाक सय्यद हे होते ते दिनांक ०१/०१/२०२३ रोजी राहत्या घरी कनकावती नगर, कन्नड येथे मयत झालेले आहे व त्यांचा अंत्यविधी कन्नड येथेच झालेला आहे. त्यांना अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. ४ यांची आई नामे मदिना इसाक सय्यद व गैरअर्जदार क्र. २ असे एकूण ३ पत्नी होत्या अर्जदार क्र. ४ यांची आई मदीना इसाक सय्यद ही मयत झालेली आहे. वरील अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाही. एकमेव अर्जदार हे कायेदशीर वारस मयतास आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमापत्राची आवश्यक असून तसेच तहसिल कार्यालय, महसूल दप्तरी वारसांची नोंद घेण्याकरिता वारस प्रमाणपत्राची गरज असल्याने वरील अधिकारी यांना वारस प्रमाणपत्राची मागणी केल्याने सदरील अर्ज करण्यास भाग पडले आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ८/१/२०२८

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

## आरोहन फायनान्शियल सर्व्हिसेसवरील कर्जावरील निर्बंध आरबीआयने तात्काळ उठवले आहेत

छत्रपती संभाजीनगर - रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, आरोहण यांनी उपचारात्मक कारवाई सुरू केली असून विविध अनुपालन सादर केले आहे. आता कंपनीच्या युक्तिवादाच्या आधारे समाधान झाल्यानंतर आणि सुधारित प्रक्रिया, प्रणालीचा अवलंब आणि नियामक मार्गदर्शक तत्त्वांचे सातत्याने पालन सुनिश्चित करण्यासाठी, विशेषत: कर्जाच्या किमतीत निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी कंपनीची वचनबद्धता लक्षात घेता, रिझर्व्ह बँकेने आरोहन फायनान्शियल सर्व्हिसेसवरील वरील निर्बंध उठविण्याचा निर्णय तात्काळ प्रभावाने घेतला आहे. ' असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. पूर्वनियोजित उपक्रमांचा एक भाग म्हणून आरोहन फायनान्शिअल सर्व्हिसेस ही अग्रगण्य एनबीएफसी एमएफआय जानेवारी २०२५ मध्ये महाराष्ट्रातील ९ ठिकाणी एका स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करीत आहे. या उपक्रमाचे उद्दीष्ट उपेक्षित समुदायातील व्यक्तींना महत्त्वपूर्ण आरोग्य सेवा प्रदान करणे आहे जेथे दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे मर्यादित आहे.

## अनुभवात्मक संगीत महोत्सव परतला आहे आपल्या तिसऱ्या आवृत्तीसह

मुंबई, १६ जानेवारी २०२५: सीग्राम्स रॉयल स्टॅग बूमबॉक्स आपल्या तिसऱ्या आवृत्तीसह परतला आहे, ज्यामध्ये बॉलीवूडच्या सदाबहार स्वरांना आधुनिक हिप-हॉप बीट्ससह संमिश्रित करण्यात आले आहे. या हंगामाचे निर्मिती संयोजन मिर्चीने केले असून, या अनोख्या अनुभवात्मक संगीत महोत्सवाने १४ जानेवारी २०२५ रोजी मुंबईत खास मीडिया प्रीव्ह्यू दरम्यान आपल्या आगामी कलाकारांची झलक सादर केली. पारंपरिक आणि आधुनिक भारतीय संगीताच्या संगमाचा उत्सव साजरा करत, हा सांस्कृतिक मिलाफ ब्रँडच्या 'लिव्हिंग इट लार्ज' तत्त्वज्ञानाचे प्रतीक ठरत आहे. संगीत हा ब्रँडसाठी ग्राहकांशी संवाद साधण्याचा महत्त्वाचा आधार राहिला आहे. रॉयल स्टॅग बूमबॉक्स धाडसाने बॉलीवूडच्या अजरामर सुरांना हिप-हॉपच्या उत्कट ऊर्जेसोबत एकत्र आणतो, ज्यातून आजच्या पिढीचे - 'जेनेरेशन लार्ज' चे अनोखे संगीत साकारले जाते. या महोत्सवाच्या आगळ्या-वेगळ्या स्वरूपामुळे एक विशिष्ट संगीतशैली तयार होते, जी आजच्या तरुणाईशी नाते जोडते. अशा एका पिढीशी, जी ट्रेंड फॉलो करत नाही, तर स्वतःच ट्रेंड घडवते.

## जाहीर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-८५६ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : बाळू नारायण दळवी रा हसनखेडा ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्राम पंचायत कार्यालय हसनखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी स्वतः विधिज्ञ ॲड. आर बी सातदिवे यांचेमार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या वडील नारायण अश्रुबा दळवीच्या मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या वडील नारायण अश्रुबा दळवीचा मृत्यू दिनांक ०९-०६-१९८३ रोजी हसनखेडा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या वडील नारायण अश्रुबा दळवीचा मृत्यू दिनांक ०९-०६-१९८३ रोजी हसनखेडा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या वडील नारायण अश्रुबा दळवीचा मृत्यू दिनांक ०९-०६-१९८३ रोजी हसनखेडा येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २७-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०९-०६-१९८३ रोजी हसनखेडा येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

संचिका १ क्रं.२०२४/उ.वि.अ.वै./ एम.ए.जी./ज.म.नोंद/सी.आर /२०२४
दिनांक :- १५/०१/२०२५.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती रेवनाथ भाऊसाहेब शिंदे रा. पिपरखेडा ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार : ग्रामपंचायत पिपरखेडा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम १(१२) व ३१ ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांची मुलगी नामे रुपाली रेवनाथ शिंदे यांचा जन्म दिनांक १९/०९/२००८ रोजी मौजे पिपरखेडा ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय पिपरखेडा ता.गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक :- १५/०१/२०२५

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

संचिका क्रं.२०२४/३.वि.अ.वै./ एम.ए.जी./ज.म.नोंद/सी.आर/ २०२४
दिनांक :- २८/११/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती ज्ञानदेव विठल सुरुशे रा. नायगाव ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय जोगेश्वरी ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचा मुलगा नामे अदित्य ज्ञानदेव सुरुशे यांचा जन्म दिनांक २७/११/२००५ रोजी विनायक ज्ञानदेव सुरुशे यांचा जन्म दिनांक ०३/०२/२००९ मौजे जोगेश्वरी ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय मुद्देशवाडगांव ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर. अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २८/११/२०२४ रोजी, माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक :- २८/११/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर

संचिका क्रं.२०२४/३.वि.अ.वै./ एम.ए.जी./ज.मू. नोंद/सी.आर /२०२४
दिनांक :- १५/०१/२०२५,

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती अशोक तुळशिराम वडकर रा.लासूररोड गंगापूर ता.गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

:: विरुध्द ::

गैरअर्जदार : मुख्याधिकारी नगर परिषद गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांची मुलगी नामे मानसी अशोक वडकर यांचा जन्म दिनांक ११/०६/२००९ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर येथे झाला असून मुख्याधिकारी नगर परिषद गंगापूर ता.गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक :- १५/०१/२०२५

उप विभागीय अधिकारी, वैजापूर

संचिका कं.२०२४/३.वि.अ.वै./ एम.ए.जी./ज.मृ. नोंद/सी.आर /२०२४
दिनांक :- ०९/१२/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री. सुनिल नामदेव कोकरे रा. नेवरगांव ता. गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैर अर्जदार :- ग्रामपंचाय कार्यालय नेवरगांव ता गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार ऋषिकेश सुनिल कोकरे यांचा जन्म दिनांक ०३/०९/२०१९ रोजी मौजे नेवरगांव ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचाय कार्यालय नेवरगांव ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०९/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक :- ०९/१२/२०२४

उप विभागीय अधिकारी, वैजापूर

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# सनातन संस्कृतीचा अग्रणी संवादक

भारतीय संस्कृतीच्या महानतेबद्दल सर्वत्र बोलले जाते. या संस्कृतीच्या प्राचीनतेचे गोडवे गायले जातात. कोणत्या प्रतीकांमध्ये, प्रसंगांमध्ये आणि देवी-देवतांमध्ये हे प्राचीनत्व दडले आहे, याचा लेखाजोखाही मांडला जातो. पाच हजार वर्षांचा इतिहास असलेल्या भारतीय संस्कृतीत राम, कृष्ण आणि शिवाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, हे आपण जाणतोच. वंदे मातरम, भारत माता की जय, जय श्रीराम, जय महाकाल... आदी घोषणांनी भारतीयत्वाची प्रचीती येते. कपाळावरील गंध, कुंकू, मनगटावरील रक्षासूत्र, भाला, त्रिशूळ, स्वस्तिक, आंब्याची पाने, हत्ती, गोमाता, साडी, बांगड्या आदींमधूनही भारतीयत्व स्पष्ट होते. अनेक वार्षिक जत्रा, यात्रा, समारंभ, जयंती पर्व, प्रकट दिन, मिरवणुका आदी उत्सवांतून भारतीयत्वाची ओळख पटते. तसाच दर १२ वर्षांनी येणारा, देशातील अठरापगड जातीच्या लोकांना सामावून घेणारा आणि भारतीयत्व प्रतिबिंबित करणारा उत्सव म्हणजे महाकुंभ. समुद्रमंथनाच्या वेळी निघालेल्या अमृताचे काही थेंब हरिद्वार, उज्जैन, नाशिक आणि प्रयागराजमध्ये पडले, म्हणून ही स्थाने मोक्षदायी मानली जातात आणि याठिकाणी येथे ग्रहांच्या स्थितीनुसार कुंभाचे आयोजन होते. प्रयागराजमध्ये दर सहा वर्षांनी माघ महिन्यात कुंभाचे आणि प्रत्येक १२ वर्षांनी महाकुंभाचे आयोजन केले जाते. या निमित्ताने साऱ्या जगातून कोट्यवधी श्रद्धाळू गंगा, यमुना आणि गुप्त रूपातील सरस्वती नद्यांच्या संगमावर पवित्र स्नानाची डुबकी लावतात. कुंभात त्रिवेणी संगमात स्नान केल्याने सारी पापे धुवून निघतात आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग मोकळा होतो, अशी हिंदू धर्मात मान्यता असल्याने आबालवृद्ध हिंदू कुंभमेळ्यात अहमहमिकेने सहभागी होतात. प्रयागराजमध्ये सोमवारपासून ४५ दिवसांच्या महाकुंभ मेळ्याला प्रारंभ झाला. हा योग तब्बल १४४ वर्षांनी जुळून आला असून, पहिल्याच दिवशी सुमारे दीड कोटी भाविकांनी आणि मकरसंक्रांतीला तब्बल साडेतीन कोटी भाविकांनी पवित्र स्नानाचा लाभ घेतला. पुढील ४५ दिवस आस्थेचा हा कुंभ अव्याहत सुरू राहणार असून, सुमारे ४५ कोटी भाविक या कुंभात सहभागी होतील, असे अनुमान लावले जात आहे. त्या दृष्टीने व्यापक तयारी करण्यात आली आहे. उत्तरप्रदेश सरकारने आंतरराष्ट्रीय दर्जाची सुरक्षा, वाहतूक, वीज, पाणी आणि निवासाची व्यवस्था केली आहे. कुंभात कुठल्याही प्रकारचा गोंधळ होऊ नये आणि सुरक्षेचा कुठलाही प्रश्न उभा राहू नये म्हणून सारे शहर आणि विशेषतः कुंभाच्या निमित्ताने उभारण्यात आलेली टेंट सिटी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज करण्यात आलेली आहे. जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे, वाहनतळ, स्वच्छतागृहे, उपाहारगृहे, निवास, गुळगुळीत विस्तीर्ण रस्ते आणि लंगरची सोय करण्यात आली आहे. पोलिस यंत्रणेला आणि लष्करालाही दिवस-रात्र डोळ्यात तेल घालून सुरक्षा यंत्रणेवर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पहिल्या दिवशी १३ आखाड्यांमधील संतांनी स्नान केले आणि आखाड्यांच्या सूचनेनुसार महाकुंभात पहिल्यांदाच शाहीस्नानाऐवजी 'अमृत स्नान' हा शब्द वापरण्यात आला. जगभरातील माध्यमे आणि ५० हून अधिक देशांतील भक्त कुंभमेळ्यात उपस्थित आहेत.

कुंभमेळ्याबाबत एक आख्यायिका सर्वत्र सांगितली जाते; ती अशी... समुद्रमंथनाने जो अमृतकुंभ समुद्राच्या बाहेर निघाला, तेव्हा देवांना प्रश्न पडला की, जर दानवांनी हे अमृत प्राशन केले, तर ते अमर होऊन देव व मनुष्यांना सळो की पळो करून सोडतील. तेव्हा देवांनी इंद्राचा पुत्र जयंत याला अमृतकुंभ घेऊन आकाशमार्गे पलायन करण्यास सांगितले. हा अमृतकुंभ देवांपासून हस्तगत करण्यासाठी दानवांनी देवांशी १२ दिवस भयंकर युद्ध केले. या युद्धकाळी अमृतकुंभामधून काही थेंब पृथ्वीवर पडले. हे अमृताचे थेंब हरिद्वार, प्रयाग, उज्जैन व त्र्यंबकेश्वर येथे पडले. चंद्राने कलशामधून अमृत सांडताना वाचविले, सूर्याने अमृतकलशाला फुटू दिले नाही व बृहस्पतीने राक्षसांपासून रक्षण केले म्हणून जेव्हा सूर्य, चंद्र व गुरू कुंभ राशीत प्रवेशतात तेव्हा कुंभमेळा भरतो.

या ऐतिहासिक महोत्सवात सुमारे ४५ कोटी भाविकांचा सहभाग राहणार असल्याने गंगा नदीच्या किनारी श्रद्धा, व्यापार आणि आधुनिक व्यवस्थापन यांचा मिलाफ बघायला मिळेल. या महाकुंभामागे एक प्रचंड आर्थिक यंत्रणा कार्यरत असून, त्यामुळे स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावरील आर्थिक प्रगतीला चालना मिळत आहे. अमेरिकेच्या लोकसंख्येच्या दीडपट भाविक कुंभात अपेक्षित असल्याने त्याचे नियोजन हे किती कठीण असू शकते, याची कल्पना कुणालाही यावी. कुंभातून अर्थसमृद्धी साधण्याचाही प्रयत्न केला जात आहे. सुमारे पाच लाख विदेशी भाविक महाकुंभाला हजेरी लावणार आहेत. महाकुंभाचे आयोजन आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सारी शक्ती पणास लावली आहे. कुंभाच्या वेळी गर्दीचे व्यवस्थापन जिकिरीचे होऊन बसते, याची जाणीव ठेवून मोदींनी महिनाभरापूर्वीच प्रयागराजला भेट देऊन साऱ्या व्यवस्थांचा आढावा घेतला होता. योगी आदित्यनाथ हे दर आठवड्याला प्रयागराजला भेट देऊन परिस्थितीवर जातीने लक्ष ठेवून होते. महाकुंभ हा श्रद्धा, विश्वास आणि वैदिक परंपरांचा अमृतकलश आहे; जिथे संस्कृतीचा आणि समरसतेचाही संगम आहे. हा महाकुंभ विविधतेतून एकतेचा संदेश देणारही आहे. महाकुंभातून केवळ आध्यात्मिक उन्नती साध्य होणार नसून, त्यातून भारताच्या उद्योग विश्वालाही उभारी येणार आहे. प्रचंड मोठी उलाढाल यानिमित्ताने प्रयागराज आणि उत्तरप्रदेशात होणार आहे. योगी सरकारने महाकुंभ मेळ्याच्या तयारीसाठी ६,९९० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. याआधी २०१९ च्या कुंभमेळ्यासाठी ३,७०० कोटी रुपये खर्च झाले होते. यावेळी ५४९ प्रकल्प हाती घेण्यात आले असून, त्यात पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थापनावर भर देण्यात आला आहे. या मेळ्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला २ लाख कोटी रुपयांपर्यंतचा सकारात्मक प्रभाव पडेल, असा अंदाज आहे. २५ हजार कोटी रुपयांची उलाढाल केवळ उत्सवाच्या ठिकाणी असणाऱ्या व्यापारातून होईल. गंगेच्या किनाऱ्यावर दीड लाख तंबू उभारण्यात आले. यात २,२०० लक्झरी तंबूंचा समावेश आहे. या तंबूसाठी प्रतिदिन १८ हजार ते १ लाख २० हजार रुपयांपर्यंत भाडे आकारले जाईल. काही तंबूंमध्ये बाथरूम, वाय-फाय, बटलर सेवा आणि हीटिंग सुविधा आहेत. याशिवाय, शहरातील २१८ हॉटेल्स, २०४ गेस्ट हाऊस आणि ९० धर्मशाळा भाविकांना निवासासाठी उपलब्ध आहेत.

विमानोड्डाण कंपन्या, रेल्वे, खाजगी बसेस, उत्तरप्रदेश परिवहन मंडळाच्या बसेस, ट्रॅक्सी, ट्रक आदींच्या व्यवसायात यानिमित्ताने वाढ होणार असून फुले, हळदी-कुंकू, रेशमी वस्त्रे, देवांचे कॅलेंडर्स, की-चेन्स, पूजा साहित्य आदींची मागणी वाढणार आहे. स्थानिक लोकांसाठी उत्पन्नाचे एक नवे साधन यानिमित्ताने उभे झाले आहे. वाहनतळ, तीनचाकी रिक्षा, ट्रॅक्टर्स, वाटाडे, फोटोग्राफर, होम स्टे आदींनाही अर्थप्राप्ती होणार असल्याने, वातावरणातील लगबग दृष्टोत्पत्तीस पडत आहे. पहिल्याच दिवशी सुमारे ३५०० जणांनी आमचे जवळचे नातेवाईक, मुले, मुली हरविल्याच्या तक्रारी नोंदवल्या. पण, चुस्त पोलिस यंत्रणेने अतिशय सुसज्ज कॅमेऱ्यांच्या माध्यमातून या साऱ्यांना त्यांच्या नातलगांकडे सुपूर्द केले. भारतातील धार्मिक आयोजनांची ख्याती कुंभमेळ्याच्या निमित्ताने साऱ्या विश्वात पोहोचली असून संबंधित संकेतस्थळांना इंटरनेटवर मोठी प्रसिद्धी मिळत आहे. सनातन संस्कृती काय आहे, तिचे महत्त्व हिंदूंशी किती आदी बाबी जाणून घेण्याच्यामध्ये पाकिस्तान, बांगलादेशसह मुस्लिम राष्ट्रांमधील सोशल मीडिया वापरकर्ते दिसून येत आहेत. महाकुंभ मेळ्यात विविध आखाडे आणि नागा साधू मोठ्या संख्येने सहभागी होतात. अघोरी साधूही महाकुंभात लक्षवेधी ठरतात. अनेक वर्षांपासून काट्यावर झोपणारे, एक हात उंचावून ठेवणारे, टेम्पोवाले साधू तसेच अंगावर भस्म लावून शंकराच्या वेशभूषेतील साधूंना बघणे हे स्थानिकांसाठी आकर्षण ठरत आहे. विविध जाती-धर्मांच्या लोकांच्या सहभागामुळे कुंभात राष्ट्रीय एकात्मतेचा अप्रतिहत प्रवाह आणि सनातन संस्कृतीबद्दलचा सुसंवादी जिव्हाळा अनुभवायला येतो. विविध कारणांनी कुंभाची ख्याती चहूदिशांना पसरली आहे. त्यातून निघणारा एकात्मतेचा सुगंध समस्त भारतीयांमध्ये दरवळावा, हीच शुभेच्छा!

---

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# मानवतेचा अमूर्त सांस्कृतिक वारसा...

स्थानाच्या नावासकट पहिल्यांदाच संपूर्ण हिंदू महाकुंभ पर्वणीचे आयोजन आज या देशात होते आहे. दर १२ वर्षांनी येणाऱ्या या पर्वणीला 'महाकुंभ' म्हणतात. दर १२ वर्षांनी गुरू ग्रहाची जी विशिष्ट स्थिती येते, त्या स्थितीला 'कुंभ योग' असे म्हणतात. गुरू ग्रहाच्या भ्रमणानुसार दर तीन वर्षांनी प्रयागराज, उज्जैन, नाशिक आणि हरिद्वार येथे कुंभ पर्वणी येते, असे म्हणतात. गुरू ग्रहाला सूर्याची प्रदक्षिणा करण्यासाठी १२ वर्षे लागतात. जेव्हा गुरू ग्रह कुंभ राशीत आणि सूर्य मेष राशीत असतात, तेव्हा हरिद्वार येथे कुंभ योग असतो. गुरू जेव्हा मेष राशीत व सूर्य चंद्र मकर राशीत असतात, तेव्हा प्रयागराज येथे कुंभ योग असतो. जेव्हा गुरू आणि सूर्य दोघेही कुंभ राशीत असतात, तेव्हा नाशिक येथे तर सूर्य मेष राशीत आणि गुरू सिंह राशीत असतात, तेव्हा उज्जैन येथे कुंभ योग असतो. यावर्षी महाकुंभाचे प्रयागराज येथे आयोजन होते आहे. या आधीचे म्हणजे २०१३ चे आयोजन अलाहाबाद येथे केले गेले होते. योगी आदित्यनाथ यांनी अलाहाबादचे नाव बदलून 'प्रयागराज' केल्यानंतर तेथे प्रथमच हा हिंदू धार्मिक सांस्कृतिक सोहळा होतो आहे. या वर्षी या महाकुंभाची सुरुवात १३ जानेवारी रोजी पाहिले शाहीस्नान, १४ जानेवारी रोजी दुसरे, २९ जानेवारी तिसरे, ३ फेब्रुवारी रोजी चौथे तर १२ आणि २६ फेब्रुवारी रोजी पाचवे आणि सहावे शाहीस्नान पर्वणी होणार आहे. एका अंदाजानुसार या वर्षी या महाकुंभाला आठ कोटी लोकं भेट देणार आहेत. या वर्षी आयोजित होत असलेल्या कुंभमेळ्याला 'महाकुंभ' म्हटले गेले आहे. कारण मुळात सूर्य, चंद्र आणि गुरू यांच्या एका विशिष्ट स्थितीवरच कुंभ योग असतो. या वर्षी येणारा खगोलीय ग्रहयोग १४४ वर्षांनंतर येतो आहे. याचा अर्थ पुढील अशा महाकुंभ योगासाठी कदाचित १०० वर्षे वाट पाहावी लागेल. या कुंभपर्वात रवियोग आणि भद्रयोग अशा दोन्ही योगांची ग्रहस्थिती असणार असल्याने याला महाकुंभ म्हटले जाते. रवी योग कोणतेही इच्छित कार्य सिद्धीस नेतो, असे सांगितले जाते. रवी योगात सूर्याच्या पवित्र ऊर्जेमुळे सुरू केलेले कार्य सिद्धीस जाते व सर्व अनिष्टतांचे निराकरण होऊन निश्चित शुभफल प्राप्त होते, असे म्हणतात. तर भद्र योग हा बुध ग्रह जेव्हा त्याच्या मूळ स्थानी किंवा उच्च घरात असतो, तेव्हा होतो. भद्र योगाच्या काळात सर्व चांगल्या गोष्टी घडतात असे म्हणतात. यावेळी पहिल्या शाहीस्नानाच्या दिवशी सकाळी ७ वाजून १५ मिनिटांपासून ते १० वाजून ३८ मिनिटांपर्यंत रवी योग; त्याच दिवशी भद्र योगदेखील होता. हे दोन्ही योग एकाच दिवशी आल्याने या वर्षीच्या कुंभाला महाकुंभ म्हटले गेले आहे. या प्रचंड मोठ्या हिंदू पर्वाचे आयोजन हे प्रशासन, विविध सेवाभावी संस्था, सुरक्षा व्यवस्था आणि सरकार यांच्यासाठी आव्हानच असते. योगी आदित्यनाथांचे सरकार आणि प्रशासन ते निश्चितपणाने पेलणार असून तयारीच्या आढावाप्रसंगी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रयागराजला भेट दिली होती.

या पर्वणीच्या दिवशी गंगेत स्नान करणाऱ्या माणसाची सर्व पापे धुतली जातात आणि त्या माणसाला मोक्ष मिळतो, अशी हिंदू धर्मात मान्यता आहे. या स्नान पर्वणीला देण्यात आलेल्या 'शाहीस्नान' या शब्दाविषयी अनेक प्रवाद, मतं-मतांतरे असली, तरी या पर्वणींना 'शाहीस्नान' हा शब्दच विशेष लोकप्रिय आहे. सूर्य आणि गुरू या राजसी ग्रहांच्या विशिष्ट स्थानांवरून या पवित्र स्नानाच्या पर्वणी ठरतात. हे ग्रह राजसी म्हणजे शाही असल्याने या पवित्र स्नानांना 'शाहीस्नान' म्हणतात, असेही एक मत आहे. तसेच एका पौराणिक कथेनुसार, समुद्र मंथनातून अमृत कलश बाहेर आल्यावर त्या अमृत प्राप्तीसाठी देव-दानवांमध्ये मोठे युद्ध झाले. या युद्धाचे दरम्यान देवांचा राजा इंद्र याचा मुलगा जयंत अमृत कलश घेऊन अत्यंत वेगाने पळू लागला. सर्व दानव त्याच्या मागे पळू लागले. या पळापळीत वा युद्धात या कलशातील अमृताचे थेंब/बिंदू ज्या ज्या ठिकाणी पडले, तेथे तेथे कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. ही चार स्थाने म्हणजे हरिद्वार, प्रयागराज, उज्जैन आणि नाशिक होत.

मात्र, हिंदू धर्माप्रती असलेल्या अत्युच्च निष्ठेमुळे आणि त्यागामुळे नागा साधूंना येथील स्नानकुंडात या पर्वणीच्या काळात सर्वप्रथम स्नान करण्याचा मान दिला गेला आहे, असे सांगतात. त्यामुळेच हत्ती, घोडे, पालख्या यांच्यासहित मिरवणुकीने हजारो नागा साधू महाकुंभात गंगास्नानासाठी येत असतात. भारतात होणाऱ्या चारही महाकुंभात म्हणजे हरिद्वार, प्रयागराज, उज्जैन आणि नाशिक येथे प्रथम स्नानाचा मान नागा साधूंचाच असतो. हिंदू धर्म वा हिंदू संस्कृतीत या पर्वणीच्या काळात केवळ पवित्र स्नान करतात असे नसून या काळात अनेक मंदिरांना देवदर्शनासाठी श्रद्धाळू भेट देतात. या काळात केल्या जाणाऱ्या दान धर्माला विशेष महत्त्व आहे. महाकुंभ हे हिंदू धर्मातील विविधतेतील एकतेचे प्रतीक मानायला हवे. महाकुंभ पर्वणीला हिंदू धर्मातील लाखो संन्यासी, साधू, पंथ, आखाडे, विविध आराध्य दैवतांची उपासना करणारे, विविध उपासना पद्धती असलेले सर्व लोक एकत्र येतात. संसारी माणसेदेखील ही स्नानाची पर्वणी साधत असतात. करोडो लोकांना त्यांच्यातील विविधता आणि मतं-मतांतरांसहित एकत्र आणणारा हा महोत्सव होय. तसेच एकदा मानाच्या आखाड्यांच्या साधुमहंताचे स्नानविधी आटोपले की, सर्व जाती, जनजाती, भाषा, प्रांतातील लोकांना एकाच वेळी स्नान करता येते. हे भेदभावरहित हिंदू समाजाच्या समरसतेचे सर्वात मोठे उदाहरणच म्हणावे लागेल.

कुंभमेळा हा अनेक दृष्टीने रोमांचक अशी पर्वणी असते. धार्मिक वा श्रद्धांचा भाग सोडून दिला, तरी या ठिकाणी हिंदू धर्मातील सर्व आचार, विचार, संहिता, तपस्या पद्धती आदींचे एकाच वेळी एकत्र येऊन प्रगटन होत असते. हिंदू धर्म विचार व पद्धतीतील हठयोगी, अघोरी, शाक्त, शैव, वैष्णव, वेदांती, अद्वैतवादी, द्वैतवादी अशा सर्व विचारधारा व आचार पद्धती एकत्रितपणे इथेच बघायला मिळतात. हिंदू धर्मातील आचार-विचार स्वातंत्र्य याच ठिकाणी स्पष्ट स्वरूपात दिसून येते. एकमेकांच्या आचार-विचारांप्रती असलेला आदर या एकत्र येण्यातून दिसून येतो. समृद्ध हिंदू धर्माचा हा मेळा असल्याने यात धर्म आणि संस्कृती यांचेही सम्यक दर्शन होते. येथे सामान्य माणसांच्या छोट्या-मोठ्या कुरबुरी होतही असतील; पण धर्म आणि संस्कृतीविषयक विविध विचारधारा, मार्ग, उपासना पद्धती यांचे स्वागत आणि सन्मानच केला जातो. हिंदू धर्म विचारांतील एकात्मतेचा आविष्कार कुंभमेळ्यात दर १२ वर्षांनी घडवून आणला जातो. पुरोगामी इतिहासकारांद्वारे अवडंबर माजवले गेलेले शैव आणि वैष्णवांमधील तथाकथित झगडे कुंभमेळ्यात दिसत नाहीत, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. स्नानासाठी संगमात उतरणारे आखाडे, संप्रदाय, पंथ आपापल्या पूर्वापार चालत आलेल्या क्रमानेच गंगास्नान करतात. प्रत्येक आखाडा, पंथ, संप्रदाय दुसऱ्यांचा अधिक्षेप न करता आपल्या विविध विशेषतांचे येथे प्रकटीकरण करीत असतात. त्याद्वारे हिंदू धर्मातील आध्यात्मिक विचार केंद्रस्थानी ठेवून आपल्या मार्गाचे, विचाराचे हे प्रकटीकरण असते.

प्रत्येक कुंभमेळ्यात कोणता तरी संप्रदाय, आखाडा, साधू किंवा साधक सामान्य लोकांचे लक्ष आकर्षित करून घेत असतो. यावर्षी जगातील सर्वात श्रीमंत महिलांपैकी एक लॉरेन पॉवेल जॉब्ज ही जन्माने ख्रिश्चन असलेली महिला लोकांचे लक्ष वेधून घेत आहे. स्टिव्ह जॉब्ज या 'ॲपल'च्या संस्थापकाच्या त्या पत्नी आहेत. २५ अब्ज डॉलर्स एवढ्या संपत्तीची ही मालकीण महाकुंभात १७ दिवस कल्पवास ठेवणार आहे. या काळात त्या एखाद्या संन्यासिनीसारखे साधे जीवन जगणार आहेत. १३ ते २९ जानेवारीपर्यंत निरंजनी आखाड्याचे आचार्य महामंडलेश्वर स्वामी कैलाशानंद यांच्या शिबिरात राहून त्या सनातन धर्म जाणून घेणार आहेत. कुंभमेळा हा हिंदू धर्माचा महाउत्सव जागतिक समुदायासाठी एक अचंबित करणारी बाब असते. हिंदू आध्यात्मिक विचारांबद्दल जॉब्ज यांना विशेष आस्था आहे. असे अनेक परदेशी लोकं महाकुंभाच्या निमित्ताने सनातन आध्यात्मिक विचार किंवा हिंदू धर्माची विशालता, तत्त्वज्ञान, परंपरा, विविध उपासना पद्धती समजून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे महाकुंभ हिंदू धर्मातील प्रचंड विविधता आपल्या कवेत घेऊन हिंदू धर्माची खरी ओळख जगभरात पोहोचवत असतो हेच खरे.

९८८१२४२२२४

---

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# स्क्रीन टाईम

सध्या माणसाचा सर्वाधिक वेळ कुठे खर्च केला जातो? या प्रश्नाचे उत्तर सर्वांनाच माहिती आहे. तरीसुद्धा सांगतो, लोकांचा सर्वाधिक वेळ स्क्रीन हाताळण्यात जातो. सकाळी उठल्यापासून तर रात्री उशिरा झोपी जाण्यापर्यंतचा वेळ फक्त मोबाईलच्या स्क्रीनवर घालविला जातो. अगदी ३ वर्षाच्या मुलापासून तर ७० वर्षांच्या वृद्धापर्यंत साऱ्यांनाच या स्क्रीन टाईमने पछाडलेले आहे. कोरोनानंतर मोबाईल हाताळणाऱ्यांच्या संख्येत कोट्यवधीने वाढ झाली. मोबाईल आता केवळ भ्रमणध्वनी राहिला नसून तो लोकांच्या जगण्याचा एक माध्यम ठरू लागला आहे. मोबाईलवर सर्वच कामे चुटकीसरशी होत असल्याने आणि हे साहित्य खिशात सतत असल्याने मोबाईलचा अतिरेकी वापरही वाढला आहे. प्रती दिवस दोन तासांवरून मोबाईलचा वापर चार तासांहून अधिक होऊ लागला आहे. मोबाईलच्या या अतिरेकी वापरामुळे विविध शारीरिक व मानसिक तक्रारी माणसाच्या आयुष्यात निर्माण झाल्या आहेत. एका आकडेवारीनुसार झोपेतून उठल्यानंतर ८५ टक्के लोक अवघ्या १५ मिनिटातच फोन चेक करतात. फोन मिळाला नाही तर ते अस्वस्थ होतात. ३१ टक्के लोक झोपण्याचा वेळ जागून मोबाईलमध्ये खर्च करतात. मोबाईलचा वापर दिवसागणीक वाढू लागला आहे. रिल्स, व्हिडीओ, संगीत, ओटीटी, मुव्ही या गोष्टींसाठी ५० ते ५५ टक्के लोक मोबाईलचा वापर करतात तर मेल, संदेश आणि कॉलिंग करण्यासाठी २० ते २५ टक्के लोक मोबाईलची स्क्रीन वापरतात. प्रवास, विविध प्रकारची माहिती जाणून घेण्यासाठी; शिवाय रेसीपी आणि नोकरीसंदर्भातील माहिती मिळविण्यासाठी केवळ ७ ते ९ टक्के लोक मोबाईलचा वापर करतात. ऑनलाईन खरेदीसाठी ५ ते ७ टक्के लोकांना मोबाईलची गरज भासते. गेमिंग खेळणाऱ्यांमध्ये ८ ते ९ टक्के लोकांचा समावेश असून यातही बालकांचे प्रमाण मोठे आहे. दिवसभरामध्ये एक व्यक्ती आपला फोन सरासरी ८० वेळा बघतो, हे अतिशय भीतिदायक चित्र आहे. स्क्रीनचा वापर किती करायचा, मोबाईलमध्ये काय बघायचे त्याला किती प्राधान्य द्यायचे हे ठरविणे आता लोकांच्या हाती राहिलेले नाही. पूर्वी शाळेतून मुलांच्या अभ्यासासाठी व इतर माहिती पालकांना देण्यासाठी स्कूल डायरी वापरली जायची. त्या डायरीत विद्यार्थ्यांच्या



प्रगतीबद्दल, त्याच्या अभ्यासाबद्दल, त्याच्या होमवर्कबद्दल वेगवेगळ्या विषयांच्या शिक्षकांकडून माहिती लिहून पाठविली जात होती. मात्र, आता शाळांनी आपले स्वत:चे ॲप उघडले आहे. काही शाळांनी व्हॉट्सॲपवर पालकांचा ग्रुप तयार करून त्यावरच संपूर्ण माहिती टाकणे सुरू केले आहे. तुमची इच्छा नसतानासुद्धा तुम्हाला असे ॲप चेक करावेच लागतात. ज्या मुलांना मोबाईल बघणे वाईट आहे, डोळे खराब होतात, जास्त वेळ मोबाईल वापरू नको असे सांगणाऱ्या पालकांनाच नाईलाजास्तव मुलांच्या हाती मोबाईल द्यावा लागतो आहे. कोरोनाच्या काळात तर सर्वच शाळांनी ऑनलाईन क्लासेस घेतले. या क्लासेसमधून विद्यार्थ्यांना काहीही कळत नसताना विद्यार्थी तासन्तास मोबाईलपुढे बसलेले असायचे आणि आजही तीच परिस्थिती दिसून येत आहे. मुलांचा अभ्यास मोबाईलशिवाय घेणे हे पालकांनाही शक्य नाही. वाचन संस्कृती मोबाईलमुळे लोप पावत चालली असून विनाकारण लोक आपला वेळ मोबाईलच्या स्क्रीनवर रिल्स, गेम्स बघण्यात घालवू लागली आहे. एका सर्वेनुसार ६५ टक्के लोक मोबाईलची बॅटरी संपल्यामुळे अस्वस्थ होतात. ४० टक्के लोक स्मार्ट फोन घेऊनच घराबाहेर पडतात. ८७ टक्के लोकांना तर मोबाईल चार्ज होण्याचा धीरदेखील नसतो; ते मोबाईल चार्ज होत असतानाच स्मार्ट फोन वापरतात. ४६ टक्के लोक दिवसातून दोन वेळा फोन चार्ज करतात. याचा अर्थ लोक स्क्रीन टाईमवर आपला किती वेळ वाया घालवितात, हे दिसून येईल. २०१० मध्ये प्ले स्टोअर्स ॲपची संख्या ०.१ लाख होती; १० वर्षांनंतर ती ३५ लाखांच्या वर पोहोचली आहे. १० वर्षांपूर्वी स्मार्ट फोनची विक्री ०.३ अब्ज होती, ही संख्या आताच्या घडीला १.४ अब्जापर्यंत पोहोचली आहे. १० वर्षांपूर्वी किती लोकांकडे इंटरनेट होते हे तपासले असता केवळ ०.१ टक्के लोकंच इंटरनेटचा वापर करीत होते. आता मात्र इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ७१ टक्के झाली आहे. मोबाईलचा दैनंदिन वापर पूर्वी दोन तासांचा होता; तो आता चार तासांहून अधिक झालेला आहे. ही आकडेवारी निश्चितच चिंताजनक आहे. मोबाईल आणि स्मार्ट फोनच्या आहारी गेलेल्या लोकांनी एकदा चिंतन करण्याची गरज आहे. मोबाईलमुळे जीवन जगणे शक्य वाटत नसले, तरी त्याचा वापर किती करायचा, कुठल्या कामासाठी करायचा हे एकदा ठरविण्याची गरज आहे. दिवसाचा किंवा आठवड्याचा आपला स्क्रीन टाईम प्रत्येकानेच तपासण्याची गरज आहे. अन्यथा याच्या दुष्परिणामाला आपल्यालाच सामोरे जावे लागेल.

९९२२९९९५८८

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# अराजकाचे दुसरे नाव केजरीवाल

दिल्ली विधानसभेच्या यावेळी होत असलेल्या निवडणुकीतून आपचे राष्ट्रीय संयोजक आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे राजकीय भवितव्य पणाला लागले आहे. दिल्ली विधानसभेची यंदाची निवडणूक अतिशय चुरशीची होत आहे. २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने जेवढी ताकद लावली होती, त्याच्या कितीतरी पट जास्त ताकद भाजपाने यावेळी लावली आहे. गेल्या ११ वर्षांपासून दिल्लीत (म्हणजे केंद्रात) सत्ता असूनही भाजपा दिल्लीतील (म्हणजे राज्यातील) सत्तेपासून दूर आहे. त्यामुळे आतापर्यंत विधानसभा निवडणुकीत दूर असलेली दिल्ली भाजपाला यावेळी आपल्याजवळ आणायची आहे. आतापर्यंत दिल्लीतील सत्तेने तीन सलग विधानसभा निवडणुकीत भाजपाला धक्का दिला. लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील लोकसभेच्या सर्व म्हणजे सातही जागा सलग तीन वेळा जिंकणाऱ्या भाजपाला दिल्ली विधानसभेची निवडणूक एकदाही जिंकता आली नाही. दिल्लीतील मतदार लोकसभेसाठी मोदींच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत असताना विधानसभेच्या निवडणुकीत केजरीवाल यांच्या झोळीत मतांचे भरघोस दान का टाकतात, याचे कोडे राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना पण अजूनपर्यंत सुटले नाही.

पंतप्रधान मोदी आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यात एक बाब वगळली तर कोणत्याच बाबतीत तुलना होऊ शकत नाही. मोदी गेल्या २५ वर्षांपासून सत्तेवर आहे, आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि आता जवळपास ११ वर्षांपासून देशाचे पंतप्रधान म्हणून. राष्ट्रीय म्हणजे दिल्लीच्या राजकारणातील मोदींचा उदय जवळपास १२ वर्षांपूर्वी झाला. केजरीवालांचा दिल्लीच्या स्थानिक राजकारणातील प्रवेशही याच दरम्यान झाला. २०१३ मध्ये मुंबईतील भाजपाच्या अधिवेशनात भाजपाच्या प्रचार समितीचे संयोजक म्हणजे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून मोदींची निवड झाली. त्याच्याच आसपास अरविंद केजरीवाल यांचाही दिल्लीच्या राजकीय पटलावर उदय झाला. समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिल्लीतील रामलीला मैदानावर भ्रष्टाचारविरोधातील आंदोलनाचे रणशिंग फुंकले. या आंदोलनाला निर्भया प्रकरणाचीही एक किनार होती. या आंदोलनात एक व्हॉलेंटियर असलेल्या केजरीवाल यांनी नंतर राजकीय पक्ष स्थापन करत दिल्लीच्या राजकारणात उडी घेतली. मोदींनी पंतप्रधान होण्याच्या चार वेळा गुजरातचे मुख्यमंत्रिपद भूषविले होते. त्यामुळे तीन वेळा दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषवल्यानंतर केजरीवाल यांनाही पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली. हा एकमेव अपवाद वगळला तर मोदी आणि केजरीवाल यांची तुलना आणि बरोबरी होऊ शकत नाही. 'कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे श्यामभटाची...' असे म्हणता येऊ शकते. केजरीवाल उच्चशिक्षित आहे, खडगपूर आयआयटीमधून त्यांनी मेकॅनिकल इंजिनीअरिंगची पदवी घेतली. नंतर युपीएसी परीक्षा उत्तीर्ण होत भारतीय महसूल सेवेत प्रवेश केला. राजकारणात येण्याआधी ते आयकर खात्यात उच्चपदस्थ अधिकारी होते. आर्थिक विषयांची त्यांना चांगली जाण आहे. त्यामुळे पुरावा न सोडता आर्थिक घोटाळा कसा करावा, यात त्यांचा हात कोणी धरू शकत नाही. एखादी व्यक्ती उच्चशिक्षित असली म्हणजे ती सुसंस्कृत असेलच असे नाही. केजरीवालांनी आपण फक्त सुशिक्षित आहे, पण सभ्य आणि सुसंस्कृत नाही, हे आपल्या कृतीने वारंवार सिद्ध केले. केजरीवालांचे राजकारण आपल्या पदाला आणि दर्जाला साजेसे असे कधी राहिले नाही. स्वत:ला आक्रमक राजकारणी सिद्ध करण्याच्या नादात आपण अराजकाच्या मार्गावर कधी चालायला लागलो, हे केजरीवालांनाही समजले नाही. आक्रमकता आणि अराजकता यातील सीमारेषा त्यांनी कधीच मिटवली. असे राजकारण करण्यात केजरीवाल यांनी जंगलराजचे आद्य संस्थापक, राजदचे सर्वेसर्वा आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांनाही कधीच मागे टाकले. केजरीवालांवर नियतीने उगवलेला सूड म्हणजे सरकारमधील भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवणाऱ्या केजरीवाल आणि त्यांच्या सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले; त्यात त्यांना अटक झाली, तुरुंगातही जावे लागले.

देशभरातील राजकारण्यात आपली वेगळी आणि साध्या माणसाची प्रतिमा निर्माण करण्यासाठी आग्रही असलेल्या केजरीवाल यांनी आपली वेगळी प्रतिमा बनवली, पण ती देशातील विद्यमान राजकारण्यांपेक्षाही आणखी खराब म्हणून. सुरुवातीला दिल्लीच्या जनतेचा विश्वास आणि त्याच्या आधारे विधानसभेच्या निवडणुकाही जिंकणाऱ्या केजरीवाल यांनी नंतर आपल्या कृतीने दिल्लीच्या जनतेचा विश्वास गमावला.

२०१५ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी दिल्लीत फिरताना सर्वत्र केजरीवाल यांची हवा दिसत होती. दिल्लीच्या कानाकोपऱ्यात फिरताना कोणालाही विचारले की, दिल्लीत कोणाची सत्ता येणार तर सर्वजण केजरीवालांचे नाव घेत होते. दिल्लीतील काही लाखांच्या घरात असलेले ऑटोवाले तर केजरीवालांचे कट्टर समर्थक होते. त्यामुळे तुम्ही ऑटोत बसून कुठे जाताना दिल्लीचे ऑटोवाले केजरीवालांचे गुणगात करत होते. १० वर्षांच्या काळात राजधानी दिल्लीतील प्रदूषित अशा यमुना नदीतून खूप पाणी वाहून गेले. दिल्लीतील परिस्थिती आता १८० अंशामध्ये बदलली आहे. केजरीवालांनी दिल्लीतील जनतेचा विश्वास गमावला आहे. सामान्य जनता त्यांच्यावर नाराज दिसत आहे. ऑटोवाले तर यावेळी पहिल्यांदाच केजरीवालांबद्दल नकारात्मक बोलू लागले आहेत. आप आणि केजरीवाल यांच्यासाठी हे शुभसंकेत नाही. २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत केजरीवालांसाठी इतके प्रतिकूल वातावरण कधीच नव्हते, जेवढे यावेळी आहे. आधीच्या दोन्ही निवडणुकांत केजरीवालांची प्रतिमा एवढी डागाळलेली कधीच नव्हती, जेवढी यावेळी कलंकित झालेली आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवत सत्तेवर आलेल्या केजरीवाल आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील अर्धा डझन मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले; नुसते आरोपच झाले नाही, तर केजरीवालांसह सर्वांना अटक झाली. सर्वांना तुरुंगाचाही मनसोक्त पाहुणचार घ्यावा लागला. केजरीवालांची स्थिती यावेळी घर फिरले की घराचे वासे फिरतात, तशी झाली आहे. केजरीवालांसाठी दिल्ली विधानसभा निवडणुकीचे आकाशच पूर्ण फाटले आहे. त्यामुळे ठिगळं तरी कुठे कुठे लावणार अशी त्यांची स्थिती झाली आहे. केजरीवालांनी दिल्लीच्या जनतेचा सर्व बाबतीत अपेक्षाभंग केला. त्यामुळे निवडणूक निकालातून जनतेने त्यांचाही घोर अपेक्षाभंग केला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

९८८१७१७८१७

---

## वाचक पत्रे

### घुसखोरांचा प्रश्न गंभीर

'अमरावतीमध्ये हजारो बांगलादेशी व रोहिंगे' ही बातमी वाचली आणि आश्चर्य वाटले. हे विदेशी घुसखोर भारतीय सीमांमध्ये प्रवेश करतात, अंतर्गत भागात पसरतात, स्वतःची आधारकार्ड, रेशनकार्ड बनवतात, घरे बांधतात, दुकाने काढतात, व्यावसायिक बनतात, मालमत्ता विकत घेतात, नंतर स्वतःच्या नातेवाईकांना आणून त्या भागांत आपले वर्चस्व प्रस्थापित करतात, देशविरोधी कारवाया करीत शेवटी स्थानिक रहिवाशांवर दहशत निर्माण करून त्यांनाच निर्वासित करतात. एवढे सगळे होऊनही सीमावर्ती राज्यांना, आमच्या मायबाप सरकारला, पोलिसांना आणि प्रशासनाला त्याचा पत्ता लागत नाही, हे आश्चर्य आहे. आपल्या देशातील कोणाच्या तरी सहकार्याशिवाय एवढे सगळे होऊच शकत नाही. आमचा देश म्हणजे धर्मशाळा झाला आहे. 'आओ-जाओ, घर तुम्हारा!' घराचा ताबा भाडोत्र्याने घ्यावा आणि घरमालकाने रस्त्यावरून जाताना 'हे आपले घर आहे' असा पोकळ बडेजाव मारावा, अशी आपल्या देशातील मूळ नागरिकांची अवस्था होण्याची वेळ आली आहे. हे सगळे टाळायचे असेल तर एकेका घुसखोराला शोधून देशाबाहेर काढले पाहिजे. सीमा सील केल्या पाहिजेत. मुख्य म्हणजे या घुसखोरांना मदत करणाऱ्या अस्तनीतील निखाऱ्यांना विझवले पाहिजे. बाहेरील शत्रूपेक्षा अशा अंतर्गत शत्रूपासून जास्त धोका आहे, याची जाणीव सर्व संबंधितांनी करून घ्यावी.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### सरकारी कार्यालयातील सुविधा

'वाचक पत्रे' या सदरात गणेश हजारे यांचे पत्र वाचण्यात आले. हल्लीच्या सरकारी कार्यालयाचे हुबेहूब चित्र हजारे यांनी यात उभे केले आहे. आपल्याकडे सरकारी कर्मचारी पानठेल्यावर उभे राहून एकमेकांना चुना लावायचे काम करतात व नागरिकांचे प्रश्न प्रलंबित राहतात. खरे तर सरकारी कार्यालयातील सुविधांचा उद्देश नागरिकांना सोयीस्कर आणि प्रभावी सेवा प्रदान करणे हा असतो. मात्र हे घडत नाही म्हणून आजकाल बहुतेक सरकारी कार्यालये ऑनलाईन सेवा प्रदान करतात. यात नागरिकांना घरबसल्या अर्ज करणे, दस्तावेज अपलोड करणे शक्य होत असून पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, जन्म प्रमाणपत्र इत्यादीसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अनेक ठिकाणी सेवा केंद्र उभारण्यात आली आहेत. या केंद्रांमध्ये नागरिकांना विविध सरकारी सेवा एकाच छताखाली मिळतात. महाराष्ट्रात आपले सरकार पोर्टल आणि सेवा केंद्र यांच्या माध्यमात नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. नागरिकांना प्रतीक्षा करावी लागते त्या ठिकाणी सुसज्ज प्रतीक्षा क्षेत्र असणे आवश्यक असून बसण्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे इत्यादींचा त्यात समावेश होतो. सरकारी कार्यालयांमध्ये दृष्टिहीन आणि अपंग व्यक्तींसाठी विशेष सुविधा असणे गरजेचे आहे. यात रॅम्प्स, लिफ्ट्स, ब्रेल लिपीमध्ये माहिती इत्यादीचा समावेश होतो. नागरिकांना मदत करण्यासाठी मित्रवत आणि सक्षम कर्मचारी असणे आवश्यक आहे. विविध माहिती फलक लावलेले असावेत; जेणेकरून नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध होईल. तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी प्रभावी शिकायत निवारण प्रणाली असणे गरजेचे आहे. इंटरनेटचा वापरासाठी वाय-फाय सुविधा उपलब्ध करून देणे. कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पुरेशी पार्किंगची सोय असणे आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सेवांची गुणवत्ता सुधारणे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढवणे, सर्व प्रक्रिया पारदर्शक करणे सरकारी कार्यालयातील सुविधा सुधारण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

### कष्ट करणाऱ्यांची स्वप्ने कधीच नष्ट होत नाहीत!

जी व्यक्ती आपल्या जीवनात सातत्यपूर्ण कष्ट करते, जी व्यक्ती आपल्या विधायक व सकारात्मक विचारांनी विविध चांगली कामे करते, अशा विधायक व रचनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्तींनी जी विधायक स्वप्ने, रचनात्मक स्वप्ने पाहिलेली असतात ती स्वप्ने पूर्णत्वास जात असतात, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. कष्टरूपी स्वप्ने पाहणारी व्यक्ती कधीच हताश-निराश होत नाही. ती भगवद्गीतेतील श्लोकाप्रमाणे कार्यरत असते. 'करम किए जा फल की, इच्छा मत कर । जैसा करम करेंगा वैसा फल देगा भगवान, ये है गीता का ज्ञान...' जी व्यक्ती आपल्या जीवनाची गाथा शून्यातून सुरू करते, तिला जीवन मार्गक्रमण करीत असताना हरण्याची किंवा हताश-निराश होण्याची मुळीच भीती नसते. सतत कार्यरत व्यक्तीला एक न एक दिवस सुवर्णकाळ येणारच असतो. जे जिवापाड कष्ट करतात,जे प्रयत्नांनाच परमेश्वर मानतात, अशा कष्टाळूंची स्वप्ने कधीच नष्ट होत नसतात. हार, पराभव, अपयश हे कधीच येत नाही. कर्म हेच परमेश्वर व पूजा मानणारे संत रोहिदास (रविदास) व अशा अनेक संत-माहात्मे व थोर समाजसुधारकांची उदाहरणे डोळ्यांसमोर ठेवली तर याची प्रचीती येते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### जगदगुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान यांच्याकडून महारक्तदान शिबीरात ५७ जणांचे रक्तदान



**जिंतूर,/प्रतिनिधी :** ग्रामीण रुणालय जिंतूर येथे १५ जानेवारी २०२५ रोजी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान मार्फत महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलेले होते.

उद्घाटन प्रसंगी माननीय श्री गंगाधरजी बोर्डीकर साहेब ( अंकल ) यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी संस्थानचे जिल्हा निरीक्षक माननीय श्री गोपीनाथजी जंगले साहेब तसेच जिल्हा बिन प्रमुख श्री कैलास बोरकर साहेब तसेच शेषराव चव्हाण साहेब तसेच सर्वांचे लाडके श्री लिंबाजीराव गायकवाड साहेब तसेच जिंतूर तालुका अध्यक्ष श्री दळवे साहेब श्री भोम्बे साहेब श्री रोकडे साहेब श्री ज्ञानोबा भामटे श्री टाके साहेब श्री संतोष दळवी साहेब श्री घुले अण्णा श्री शहाणे साहेब व इतर सर्व युवा वर्ग उपस्थित होता. रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण ५७ रक्तदात्यांनी रक्तदान केले रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी तसेच युवावर्गांनी अथक परिश्रम घेतले.

### इंधन बचत ही काळाची गरज- रायपत्रीवार



**जिंतूर,/प्रतिनिधी :** सबंध देशात इंधन बचत ही काळाची गरज असल्याचे मत येथिल प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष सचिन रायपत्रीवार यांनी इंधन बचाव उद्घाटन पर कार्यक्रमात येथील एसटी आगारात संपन्न झालेल्या कार्यक्रमात बोलत होते.

त्यांनी पुढे विशेषतः उपस्थित एसटी चालक बांधवाना विशेष मार्गदर्शन करत असेही सांगितले की राज्यातील एसटी विभागाचा इंधनावर जास्तीत जास्त खर्च होतो तो खर्च आटोक्यात आणण्याची जबाबदारी ही विशेषता चालक वर्गावर अवलंबून असते तेव्हा चालक वर्गांनी मार्गस्थ होताना इंधन बचत सूचनेचे पालन करावे विशेषता गाडीचा वेग नियंत्रणात असावा,क्लचा व एक्सीलेटरचा वापर योग्य वेळी करावा, मार्गस्थ असतांना टायरची व गियर ऑईलची तपासणी करावी,आवश्यक असेल तरच ब्रेकचा वापर करावा,वेग मर्यादित असेल तर डिझेलची बचत नक्कीच होते,योग्य वेळी गियर बदली करावा,एकाच वेगात गाडी जास्तीतजास्त नंतर नेण्याचा शक्य तो प्रयत्न करावा,पुढे येणाऱ्या नियोजित थांब्यावर अगोदरच वेग कमी करावा आणि विशेष म्हणजे गाडी नेहमी स्पेशल गियर मध्ये उचलावी अश्या इंधन बचतीच्या मोलाच्या मार्गदर्शक सूचना प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष सचिन रायपत्रीवार यांनी उपस्थित चालक वर्गास केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिन रायत्रीवार हे होते.प्रमुख उपस्थितीत,अग्रवाल, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक पौळ, स्थानक प्रमुख आर.एस. सोनवणे,वाहतूक निरीक्षक शरद पाटील,वरिष्ठ सहाय्यक प्रल्हाद मुंढे, वाहन परीक्षक संजीव भांबळे,इंधन लिपिक गजानन गीते,गुणीरत्न वाकोडे,सुरक्षा रक्षक सय्यद समी व चालक बांधव मोठ्या प्रमानावर उपस्थित होता.

१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी अश्या मासिक इंधन बचाव मोहीम कार्यक्षमतेने राबवण्या साठी आगाराच्या दर्शनी भागी इंधन बचाव मोहिमेचे बॅनर लावण्यात आलेले असून सदरील मोहीम यशस्वीपणे राबवण्या साठी प्रत्येक चालकांचे इंधन बचावा बाबत आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण व स.का.अ.पौळ,आदी कडून प्रबोधन करण्यात येत असून आगारातील प्रत्येक चालकांना इंधन केपीटीयल डायऱ्यांचे वाटप केलेले असून कमी केपीटीयल व जास्त केपीटीयल आणणाऱ्या चालकांची दररोज नोंद होत असून त्यांचे दररोज केपीटीयल वाढवण्या बाबत चालकांचे प्रबोधन होत आहे.अशी माहिती आगार व्यवस्थापक आंनद चव्हाण व स.का.व.पौळ यांनी दिली.

### प्रिन्स इंग्लिश स्कूलचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत १०० % निकाल

**सेलू,/प्रतिनिधी :** प्रिन्स इंग्लिश स्कूलचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत १०० % निकाल लागला आहे.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा २०२४ मध्ये श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल के आर रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा निकाल १००% राखला आहे.



**जिंतूर- राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मतदारसंघात सर्वात जास्त नोंदणी केल्या बद्दल प्रल्हाद दाभाडे यांचा सत्कार करताना अॅड.सुनिल मते, स्वीस खेत्रे आबा, रामराव घुगे, कासाबाई बुधवंत,दत्तराव राऊत, सुधाकर हाके, आदिनाथ गिरी, अर्जुन गरड, अंकुश आदी दिसत आहेत.**

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी–विक्री–प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# श्री जन्मोत्सव व रौप्य महोत्सवाची सांगता -ह.भ.प. चंद्रशेखर महाराज यांची किर्तनसेवा

## कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार



**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-:** तालुक्यातील श्रीक्षेत्र धनगर टाकळी येथे श्री सद्गुरु दाजीमहाराज जन्मोत्सव व सच्चिदानंद वेध स्वाध्याय प्रतिष्ठान रौप्य महोत्सवाची सांगता मंगळवारी (दि. १४ ) ह.भ.प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

श्रीक्षेत्र टाकळीत दि. २ ते १४ जानेवारी या कालावधीत हा सोहळा पार पडला. सोमवारी (दि.१३ ) भागवतभूषण ज्योतिषाचार्य पंडित अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांची श्रीमद् भागवतकथा व श्री लक्ष्मीनारायण पंचायतन पंचकुंडी यज्ञाची समाप्ती झाली. दुपारच्या सत्रात रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्रसिद्ध सिने अभिनेते मनोज जोशी, पंडित अतुलशास्त्री भगरे गुरुजी, संस्थानाधिपती उमेशमहाराज टाकळीकर यांच्या उपस्थितीत वैदिक, समाज प्रबोधन, आरोग्य, विज्ञान, उद्योग, समाज संघटन, पत्रकारिता, न्यायदान, सनदी सेवा, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक इत्यादी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्ती व सद्गुरुभक्तांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यात वेदमूर्ती श्रीनिधी धायगुडे (पुणे ),न्यायरत्न व मीमांसाकार राजेश्वर देशमुख घोडजकर (नांदेड), वे.शा.सं. प्रमोदशास्त्री कुलकर्णी, ह.भ.प. प्रभाकरबुवा आजेगावकर ,डॉ. श्रीकृष्ण कातनेश्वरकर, डॉ. श्रीपाद धानोरकर, डॉ. गोपाल जवादे, डॉ. सुशील राठी, लेखापरीक्षक व कर सल्लागार शंकरराव गुजराती, ज्येष्ठ संघसेवक शामराव जहागीरदार, सद्गुरुभक्त ह.पं. पाटील, उद्योजक विवेक वट्टमवार, श्रीनिवास काबरा, आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त सनदशीर अधिकारी संतोष अजमेरा, दैनिक प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे, संपादक संतोष धारासुरकर, निवृत्त न्यायाधीश मोहनराव चौधरी, वेदमूर्ती अभिनव जोशी (हैदराबाद), वेदमूर्ती विद्यासागर देव (वाराणसी), वेदमूर्ती मनोज जोगळेकर (पुणे), वेदमूर्ती विजय सहकारी (गोवा), वल्लभ रामचंद्र मुंडले (सिंधुदुर्ग) व निखिल जोशी (जिंतूर) या २५ जणांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी विचार मांडताना सिने अभिनेते जोशी यांनी भारतीय संस्कृती मानवाला सुसंस्कृत बनविते गुरुकुलाची बहुश्रुत परंपरा येथे लाभली ; मात्र ही परंपरा संपविण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला. मौखिक ज्ञानपरंपरेने ही संस्कृती टिकू शकली. या परंपरेचे धार्मिक व वैज्ञानिक महत्त्व पटवून देण्यासाठी सर्वांनी कार्य करण्याची गरज व्यक्त केली.

यावेळी सत्कारमूर्तींच्या वतीने शामराव जहागीरदार, प्रमोदशास्त्री कुलकर्णी, डॉ. श्रीकृष्ण कातनेश्वरकर यांनी सत्कारास उत्तर दिले. वेदमूर्ती उमेशमहाराज टाकळीकर यांनी गुरुकुलाच्या वाटचालीची पार्श्वभूमी विशद करून अनेकांनी या कार्यात तनमनधनाने केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन डॉ. हरिभाऊ पाटील व आभार प्रदर्शन वेदमूर्ती यज्ञेश्वर लाटकर यांनी केले.

मंगळवारी सकाळी ह.भ.प. चंद्रशेखरमहाराज देगलूरकर यांनी काल्याच्या किर्तन सेवेत संवादाचे प्रकार व महत्त्व प्रतिपादित केले. संवादातून तत्त्वबोध व्हावा. साधुसंतांनी सांगितलेल्या सन्मार्गाचं अनुसरण करावं. त्यातून मानवाचं कल्याण होईल, असा संदेश दिला. महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता झाली.




## तळीराम वाहन चालकांवर होणार सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** कोणीही चालकाने दारू पिऊन वाहन चालवल्यास व तो मृत्यूस कारणीभूत ठरल्यावर त्याच्याविरुद्ध सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक रविद्रसिंह परदेशी यांच्या आदेशावरून सोनपेठ चे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांनी दिली आहे. सध्या दारू पिऊन दुचाकी, चार चाकी वाहने चालविणे ही एक फॅशन बनली आहे. त्यामुळे अनेक निरपराध नागरिकांचे बळी जात आहेत. परंतू यापुढे आशा वाहन चालकाचे विरोधात सोनपेठ पोलीसांनी चांगलाच बडगा उगारला आहे. मागील ४ सप्टेंबर २०२४ रोजी सोनपेठ तालुक्यातील महाविष्णू तांडा पाटी जवळ, शेळगावचे इरफान काझी व राजकुमार बागवाले हे दुचाकीवरून सोनपेठ कडे जात होते. त्यावेळी कारचालक अमोल वामन डुकरे यांनी दारू पिऊन नशेमध्ये भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने कार चालवून सदरील मोटरसायकलला जोराची धडक दिली. त्यामध्ये दोन्ही दुचाकी स्वरांचा मृत्यू झाला. त्या अनुषंगाने मृत्यूस कारणीभूत ठरवून त्याचे विरुद्ध सोनपेठ पोलीस ठाण्यात सदोष मनुष्य वाधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीस माननीय न्यायालयाने जामीन फ`टाळून कारागृहात रवानगी केली. त्यानंतर पुन्हा असाच प्रकार ५ जानेवारी रोजी शेळगाव रोडवर घडला. त्यावेळी सोनपेठ येथील येथून भीमराव गोविंद चांदवडे हे ६० वर्षाचे वयोवृद्ध सोनपेठ कडून शेळगाव कडे दुचाकी वरून जात असताना, पाठीमागून आलेली सोनपेठ येथील आपत्कालीन सेवा देणारी १०८ या रुग्णवहीकेने दुचाकीला जोराची धडक दिली. व चांदवडे यांचा मृत्यू झाला. यावेळी सदरील रुग्णवहीका चालक मुंजा कारभारी आळसे याने मध्य धुंद अवस्थेत निष्काळजीपणे भरधाव वेगाने रुग्णवाहिका चालवल्या प्रकरणी त्याचे विरुद्ध सदोष मनुष्य वधाचा गुन्हा सोनपेठ पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आला.

त्यानुसार त्याला अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यालाही जेलची हवा सुनावली आहे. यापुढे असा प्रकार कोणत्याही वाहन चालकाच्या हातून दारू पिऊन घडल्यास त्याच्याविरुद्ध अशाच प्रकारे सदोष मनुष्य वधचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती सोनपेठ चे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. वाहन चालकांनी दारू पिऊन वाहन चालवू नये असे आव्हान सोनपेठ पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## पाथरी बाजार समितीच्या सभापतीपदी नखाते कायम

### विभागीय सह निबंधकांनी जिल्हा उपनिबंधकाचे आदेश केले रद्द



**पाथरी,/प्रतिनिधी-** पाथरी बाजार समितीचे सभापती अनिल नखाते यांच्या विरुद्ध दाखल झालेल्या जुन्या प्रकरणात नखाते यांचे संचालक पद रद्द करण्याचा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांनी काढलेला १४ ऑक्टोबर २०२४ चा आदेश छत्रपती संभाजी नगरचे विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी रद्द केला आहे. त्यामुळे अनिल नखाते याची सभापतीपदी वर्णी कायम राहीली आहे.

संचालक एकनाथ घांडगे व ईतर ४ जणांच्या जुन्या तक्रारीनुसार अनिल नखाते यांना महाराष्ट्र बाजार समितीच्या नियम २०१७ मधील नियम १० (१) नुसार संचालकपदी १० ऑक्टोबर २०२४ रोजी अपात्र घोषित केले या निर्णयाविरुद्ध अनिल नखाते यांनी १६ ऑक्टोबर रोजी विभागीय सहनिबंधक छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे अपील दाखल केले आहे.यामध्ये १८ ऑक्टोबर रोजीच्या सुनावणीत हस्तक्षेपक म्हणून अमोल बांगड व शाम धर्मे यांनी अर्ज दिला याप्रकरणात प्रतिवादीची संख्या १० अशी झाली.या प्रकरणात ५ वेळा सुनावणी घेण्यात आली. यामध्ये अनिल नखाते यांच्या वतीने अॅड.जि.व्ही.सुकाळे यांनी केलेल्या युक्तीवादात अनिल नखाते यांना सभापती पदावरून हटविण्यासाठी केवळ राजकीय हेतून केलेल्या तक्रारी अनुषंगाने आव्हानीत आदेश हे चुकीचे आहेत. कारण प्रस्तुत प्रकरणात नखाते यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची संधी देण्यात आलेली नाही. नखाते यांच्या अपात्रतेसाठी हेतुपुरस्सर कंपनीचा संबध लावला गेला आहे. तसेच नखाते यांना देण्यात आलेल्या दि. २८.०५.२०२४ रोजीच्या नोटीसमध्ये उत्तर देण्यासाठी कोणतेही आरोप नमूद करण्यात आलेले नाही.प्रकरण ३१ जुलै रोजी निकालासाठी बंद केले असतांनाही १ ऑगष्ट रोजी सचिव यांचा स्वतंत्र अहवाल कसा घेतला.या सर्व बाबी विचारात घेता नखाते यांचे संचालक पद रद्द करण्याचा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी दि. १४.१०.२०२४ रोजीचे आव्हानित आदेश रद्द करण्यात यावे असे मत मांडले.या प्रकरणात प्रतिवादी यांचे वतीनेही अॅड.एम.आर. चौधरी,अॅड.के.जे. सुर्यवंशी, अॅड.मनिष त्रिपाठी यांनी युक्तिवाद केला.दोन्ही बाजुचा युक्तिवाद ग्राह्यधरुन छत्रपती संभाजी नगरचे विभागीय सहनिबंधक शरद जरे यांनी ३१ डिसेंबर रोजी अनिल नखाते यांना संचालक म्हणून अपात्र ठरविणारा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांचा १४ ऑक्टोबर २०२४ चा आदेश रद्द केला आहे.तसेच हे प्रकरण फेरनिर्णयार्थ प्रतिप्रेषीत करण्यात आले आहे असे आदेशीत केले.या निर्णयामुळे अनिल नखाते यांचे सभापतीपद कायम राहीले आहे.

## रौप्य महोत्सवी वर्षात स्व.नितीन चषक स्पर्धेच्या क्रिकेट स्पर्धेचे थाटात उदघाटन



**सेलू,/प्रतिनिधी :** नितीन कला व क्रीडा युवक मंडळ यांच्या वतीने स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले .

दिनांक १५ जानेवारी रोजी नूतन महाविद्यालयाचे क्रीडांगणावर अतिरिक्त पोलीस अधीक्षक यशवंतराव काळे यांच्या शुभहस्ते क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले . कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष नितीन मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार हरिभाऊ लहाने ,प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव संतोष बोबडे, श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय रोडगे, भाजपा तालुका अध्यक्ष अॅड. दत्तराव कदम , प्रसिद्ध उद्योजक जयप्रकाश बिहाणी, पोलीस निरीक्षक दीपक बोरसे, डॉ.अशोक नाईकनवरे, माजी सभापती दिनकर वाघ, जिल्हा सचिव अब्दुल रहिम, आदी मान्यवर उपस्थित होते. संतोष बोबडे म्हणाले की गेल्या २५ वर्षापासून सातत्याने चालणारी ही मराठवाड्यातली पहिली क्रिकेट स्पर्धा असून या क्रिकेट स्पर्धेतून अनेक राष्ट्रीय खेळाडू घडले आहे ,संदीप भैया ने जमीन दिल्यास या ठिकाणी महाराष्ट्र असोसिएशन व परभणी जिल्हा असोसिएशनच्या वतीने एक सुंदर क्रिकेट स्टेडियम उभारण्यात येईल याचा संपूर्ण खर्च राज्य संघटना वतीने करण्यात येईल असे सांगितले. उद्घाटक यशवंत काळे म्हणाले सातत्यातून कुठलीही गोष्ट यशस्वी होते याचे ज्वलंत उदाहरण नितीन क्रीडा मंडळाने पंचवीस वर्षापासून चालवलेल्या क्रिकेट स्पर्धेचे आज रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. कार्यक्रमाचा अध्यक्ष समोर माजी आमदार हरिभाऊ काका लहाने यांनी केला तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव संदीप भैय्या लहाने यांनी केले यात्रसंगी संदीप भैया लहाने यांच्यावतीने विविध क्रिकेट क्लबला गणवेश वाटप करण्यात आला रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त प्रेक्षकांनाही आकर्षक सायकलचे बक्षीस देण्यात येणार आहे.

## जिंतूर एमआयडीसीमध्ये अंधाराचे साम्राज्य- उद्योजकामध्ये भितीचे वातावरण

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर -औंढा रोडवरील पुंगळा औद्योगिक वसाहती मधील रोडवरील लाईट एक महिन्यापासून बंद असल्यामुळे अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे .

याच अंधाराचा फायदा घेऊन तालुक्यातील सक्रिय चोरटे या भागात चोरी करीत आहेत. एम,आय,डी,सी वसाहती मधील रोड वरील एल,ई,डी लाईट एक महिन्यापासून बंद अवस्थेत आहेत. एमआयडीसीचे अधिकारी व गुत्तेदार यांच्या संगनमताने सदरील हा खेळ चालू असून उद्योजकांनी केलेल्या तक्रारीकडे सदरील अधिकारी दुर्लक्ष करत असून याचा फायदा भुरटे चोर घेत आहेत. अनेक उद्योजकांच्या चोऱ्या होत आहेत. तर रोडवरच आंबट सुखीन रोजच दारूच्या बाटल्या फोडून फोडून उद्योजकाशी आर्यची भाषा करीत आहेत .अधिकाऱ्यांशी तक्रार केली असता उडवा उडवीचे उत्तरे देऊन सदरील औद्योगिक वसाहतीमध्ये जाणून-बुजून दुर्लक्ष करीत असून . ऊधोजकाने तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात आहे .

सदरील पोलवरील लाईट वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन दुरुस्त करावे. अशी मागणी उद्योजकामधून केली जात आहे.

सदरील एम.आय.डी.सीचे अभियंता यांच्याकडे फोनवर व लेखी स्वरुपात तक्रार करूनही या बाबीकडे दुर्लक्ष केले जात आहे. एम.आय.डी.सी थातूरमातूर एक दोन लाईट चालू करते व दुसऱ्या दिवशी बंद करते. परतू बिल मात्र पास करून घेतले जाते..असा प्रकार नित्य झाला आहे. संबंधित वरीष्ठ अधिकारी यांनी लवकरच चालू करावेत. आशी मागणी केली जात आहेत.







बीड शहरातील बार्शी रोडवर पडलेल्या खड्ड्यामुळे वाहन चालकांचे वाहनावरील संतुलन सुटून अपघात होण्याची शक्यता आहे. (छाया-कृष्णा शिंदे)

# अतिक्रमण धारकांच्या उलट्या बोंबा

## अतिक्रमण पाडले म्हणून नुकसान भरपाई ची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ जानेवारी**



अंबाजोगाई शहरातील मुख्य रस्त्यावर केलेल्या अतिक्रमणावर प्रशासनाचा हातोडा पडताच अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण पाडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

अंबाजोगाई शहरातील विविध विकास कामे सुरू झाली आहेत.शहरातील भगवान बाबा चौक ते स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय या मुख्य रस्त्यावर अनेक नागरिकांनी अतिक्रमणे करून पक्की घरे बांधली होती.सार्वजानीक बांधकाम विभाग अंबाजोगाई यांनी त्यांना नोटीस बजावून सदर अतिक्रमणे काढून घ्यावीत अशी सूचना नागरिकांना केली होती.ती न काढल्याने प्रशासनाच्या वतीने सदर अतिक्रमणे पाडून जमिनदोस्त केली आहेत.

दरम्यान या संदर्भात आज इस्माईल गवळी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत अतिक्रमण धारकांचेच समर्थन करुन अंबाजोगाईत चाललेली विकास कामे गुत्तेदार पोसण्यासाठी आहे,असा विकास आम्हाला नको असून सा.बा.विभागाच्या बदमाश अधिकाऱ्यांनी कुठलीही शहानिशा न करता गोरगरिबांची घरे पाडली, उध्वस्त केली,असा आरोप करुन झालेल्या कारवाई चा पंचनामा करावा व नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली ते न केल्यास आम्ही नुकसान भरपाई चे दावे दाखल करणार असल्याचे सांगितले.

दरम्यान सदर बाजार परिसर मुळ लष्कराचा मालकीची जागा आहे.मध्यंतरी लष्कराचा अधिकाऱ्यांनी जागेची मोजणी केली होती खूणा निश्चित केल्या होत्या.त्या भूखंडावर अतिक्रमणच करता येत नाही.हे माहिती असतांना अतिक्रमण केले गेले व पाडल्यानंतर नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली जात आहे.



बीड शहरातील श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह आयोजन केले आहे याबाबत भाविक भक्ताची भक्त मंडळ यांच्याशी सविस्तर चर्चा मार्गदर्शन करताना संस्थांचे अध्यक्ष नवनाथांना शिराळे पाटील व पांडुरंग मामा जानवळे प्राध्यापक महादेव आंदळकर प्राध्यापक राम मुळे आत्माराम शिराळे गोविंद शिराळे पाटील प्रधान पवार काळे मामा इत्यादी सह संस्थांचे सदस्य यावेळी उपस्थित होते यावर्षी आपण हरिनाम सप्ताह अत्यंत जोमाने करण्याचा मानस यावेळी नवनाथांना शिराळे यांनी केला आहे तरी भावी भक्ताने याची नोंद घ्यावी असे आव्हान नवनाथ शिराळे अण्णा यांनी केले आहे

# अंबाजोगाई शहरात अज्ञात हल्लेखोरांनी केला सुजित सोनी या व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ जानेवारी**

अंबाजोगाई शहरात अज्ञात हल्लेखोरांनी केला सुजित सोनी या तरुण व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना आज रात्री ९ ते ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

सुजित श्रीकिशन सोनी यांची नगर परिषद परिसरात कोलगेट सह अन्य कंपन्यांची एजन्सी असून ते काल रात्री ९ ते ९.१५ च्या दरम्यान आपले दुकान बंद करून आपल्या दुचाकीवरून परत जात असताना शासकीय विश्राम गृहाच्या पुढे पोलीस कॉलनी नजीक मोबाईल आल्याने बोलत थांबले असता मागून दुचाकीवर आलेल्या अज्ञात तीन हल्लेखोरांनी त्यांच्यावर कोयत्याने प्राण घातक हल्ला केला. यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्या डोक्याला व हाताच्या बोटावर मार लागला आहे. त्यांच्यावर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सुजित सोनी हे व्यापारी असल्याने त्यांना लुटण्याचा उद्देशाने हा हल्ला केला असल्याचा प्राथमिक अंदाज असून या घटनेने अंबाजोगाई शहरात खळबळ उडाली आहे.

दरम्यान,पोलीस तपासात ही घटना शासकीय विश्रामगृहा च्या जवळ न घडता यशवंतराव चव्हाण चौकातील नगर परिषद व्यापारी संकुलात असलेल्या हॉटेल कोकीता च्या मागील बाजूस घडल्याचे समोर आले असून या घटनेचे वास्तव शोधून काढण्यासाठी बीड च्या गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक ही अंबाजोगाई मध्ये दाखल झाले आहे.

# नगदनारायण कॉलनीतील नागरीकांनी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंचा केला सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ जानेवारी**

बीड शहरातील नगद नारायण कॉलनीतील नागरिकांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नुतन बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचा सत्कार पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बीड शहरातील नगर राजेंद्र मस्के यांनी सातत्याने नगद नारायण कॉलनीतील नागरिकांसी संपर्क ठेवला. त्यांच्याशी संवाद साधून विविध समस्या लक्षात घेऊन त्यांना मदत करण्याचे काम केले. रस्त्याच्या दुरावस्थे मुळे नागरिकांचे होणारे हाल लक्षात घेऊन तेथे रस्ता व नालीचे काम करून त्यांना दिलासा दिला. आज संघर्षयोद्धा संपर्क कार्यालयात येथील नागरिकांनी राजेंद्र मस्के त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी गव्हाणे सर, कथले सर, काळे सर, मेंगडे सर, ठोंबरे सर, गहीनाथ भिसे,अशोक देवगुडे, विष्णु वारे,विजय रंजेगावकर, आधी उपस्थित होते

# सरस्वती महाविद्यालयात विद्यापीठ नाम विस्तार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१६ जानेवारी**



उपेक्षित, वंचित, गरीब, मजूर,शेतकरी यांच्या प्रवाहा बाहेरील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची द्वारे मराठवाड्यासारख्या अविकसित भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाच्या माध्यमातून खुली केली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नाम विस्तार दलित, उपेक्षित आणि बहुजनांचा विचाराचा विजय असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले. ते सरस्वती महाविद्यालय केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विस्तार दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम पाटील हे होते.

अध्यक्ष समारोपप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले की, विद्यापीठाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे ही फक्त बाबासाहेबांना नव्हे तर विद्यापीठासाठी अत्यंत गौरवाची बाब असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास प्रा डॉ आहेर,प्रा डॉ चाटे,प्रा डॉ शिंदे,प्रा डॉ आरडले,प्रा डॉ वराळे,प्रा डॉ कराळे आदींची होती. सूत्रसंचालन प्रा. डॉ. किरणकुमार धिमधिमे तर आभार प्रा. डॉ. सारिका बुरगे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# महारेशीम अभियान चित्ररथ जिल्ह्यात रवाना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ जानेवारी**



जिल्हा रेशमि उद्योग कार्यालयामार्फत आयोजित महारेशीम अभियानाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष शामसुंदर पडुळे, उपस्थित होते.

यावेळी रेशीम विभागाकडून तयार केलेल्या रथास निवासी उपजिल्हाधिकारी यांनी हिरवी झेंडी दाखवून रेशिम अभियानाची सुरुवात केली. हे अभियान ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत असून विभागाकडून गावोगावी कार्यक्रमाव्दारे रेशीम शेतीचे महत्व व अल्प पाण्यावर नगदी पीक असल्यने वर्षातुन ४ ते ५ पीके निघत असल्यने तसेच इतर पारंपारिक पिकापेक्षा जास्त उत्पन्न निघत असल्याचे शेतकरी वर्गात जनजागृती करुन करुन नोंदणी करण्यात येते. नोंदणी केलेल्या अल्पभुधारक शेतकऱ्यांना मनरेगा अंतर्गत ४,८,०००/- १०० टक्के अनुदान देण्यात येते.

जे लाभार्थी मनरेगा अंतर्गत नाहीत बहूभुधारक यांना विभागाकडून सिल्क समग्र योजने अंतर्गत देण्यात येते.

राज्यात बीड जिल्हा रेशीम उत्पादनात प्रथम क्रमांकावर आहे जिल्हयात ५४०६ शेतकरी यामध्ये काम करत असून रेशीम उत्पादनामुळे उसतोड कामगार म्हणून ओळख असलेल्या या जिल्हयाची ओळख रेशीम उत्पादक जिल्हा म्हणून होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विभागाकडून शासनमान्य कोष खोली बाजारपेठ उभारणी केली असून यामध्ये मोठया प्रमाणात कोष खरेदी (राज्यात प्रथम क्रमांकावर) केले जात आहे.

सन २०२३-२४ मध्ये ११०९ मेट्रिक टन कोष शेतकऱ्यांनी विक्री केले असून सन २०२४- २०२५ मध्ये १५ डिसेंबर २४ अखेर १०२२ मे. टन कोषाची खरेदी झाली असून सध्या कोषाचे सरासरी दर ५५०-६५० च्या प्रति क्विंटल असल्यने शेतकऱ्यांचा कल रेशीम शेतीत वाढत चालला आहे.यावेळी रेशीम विकास अधिकारी एस.बी. वराट, ए.एम सोनटक्के, एस.आर. राठोड, एस.व्ही बावणे, एस.आर.पाटील, व्ही. एम मस्के, जी. एम शेळके, डी.बी. मिर्झा तसेच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शेतकरी शिवराज काटे, श्री. सपकाळ हे उपस्थित होते. या कालावधीत जास्तीत जास्त शेतकऱ्यांने रेशिम करिता नोंदणी करण्याचे आवाहन रेशीम विकास अधिकारी यांनी केले आहे.

# तरुणीची छेड काढल्याच्या कारणावरुन दोन गटात हाणामारी

## २५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १६ जानेवारी**

बारालिंग यात्रेत मुलींची छेड काढण्याच्या कारणावरून दोन गटात झालेल्या राड्यानंतर नारेबाजी करीत शहरात जबरदस्त दगडफेक झाल्याने दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. ही घटना दि. १५ रोजी बुधवारी रात्री घडली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये, म्हणून शहरात मोठी पोलीस कुमक मागवण्यात आली होती. बुधवारी रात्री व गुरुवारी शहरात संचारबंदीसदृश्य परिस्थिती होती. मात्र शहरात तणावपूर्ण शांतता होती. याप्रकरणी पोलिसांच्या फिर्यादीवरुन दोन्ही गटातील ३० ते ४० जनावर विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आली.

तामसा येथील बारालिंग यात्रेतील



गर्दीचा फायदा घेत काही तरुणांनी मुलींची छेड काढण्याचा प्रकार उघडकीस आल्याने तरुणांच्या दोन गटात हाणामारी झाली. यात्रेला गालबोट लागू नये म्हणून तो वाद तेथेच मिटवला गेला. परंतु रात्री उशीरा जुन्या गावातील रस्त्यावर मोटारसायकल आडवून त्याला मारहाण केली. त्यावेळी भांडण सोडवायला गेलेल्या ग्रामपंचायत सदस्य शाकीर पठाण उर्फ इरफान खान पठाण यांचे डोके फुटले. त्यानंतर तामसा होळीगल्ली, डॉ. हेडगेवार मार्केट, आठवडा बाजारातून तुफान दगडफेक झाली. घटनास्थळावर तामसा पोलीस व भोकर उपविभागीय पोलिस अधिकारी शफाकत आमना यांच्या गाडीवर, दुकानावर दगडफेक करुन मोठे नुकसान केले. समाजकंटकांनी घरांवर दगडफेक करून दहशत निर्माण केली होती. खाटीक गल्ली येथे दोन गट समोरासमोर भिडले होते. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे होणारा अनर्थ टळला. आठवडी बाजारात जमलेल्या जमावाने तामसा जुने बसस्थानक चौकात दगडफेक केल्यामुळे शहरात तणावाचे वातावरण होते. मध्यरात्रीनंतर पोलीस राखीव दलाची तुकडी तैनात केली. याप्रकरणी मारहाणीत चारजण किरकोळ जखमी झाले आहेत. समाजकंटकांनी एका दुचाकीचे नुकसान केले. पोलीस ठाणे परिसरातील दुकानातील सामानांची तोडफोड झाली. रात्री उशिरापर्यंत दगडफेक व राडा चालूच होता. रात्री उशीरा जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी करीत शांततेचे आवाहन केले. याप्रकरणी फौजदार बालाजी नरवटे यांच्या फिर्यादीवरून गुन्ह्यांची नोंद झाली. याच प्रकरणी तीन फिर्यादी वरून अनेकांविरुद्ध मारहाण करून जखमी केल्याचे गुन्हे नोंदले आहेत. पोलिसांनी आरोपींची धरपकड केली असून अनेक जण फरार आहेत. शहरात तणावपूर्ण शांतता आहे. विशेष म्हणजे गुरुवारी तमसा व्यापार पेठ कडकडीत बंद होती. अनेक पालकांनी भीतीपोटी पाल्यांना शाळेत न पाठवल्याने शहरातील शाळा भरल्याच नाहीत.

# गावठाण जमिनीवर अतिक्रमण

## दारुडे व जुगाऱ्यांच्या उच्छादाने नागरिक त्रस्त



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १६ जानेवारी**

तालुक्यातील शहरालगत असलेल्या लिंबगाव ग्रामपंचायत अंतर्गतच्या गावठाण जमिनीवर माजी सरपंच व लोकप्रतिनिधींनी अतिक्रमण केले आहे. या जागेवर पत्राचे शेड उभारून तेथे दररोज दारूच्या पार्ट्या व जुगाराचे डाव चालत असल्याने गावकऱ्यांना नामुश्कीला सामोरे जावे लागत असल्याने सदर अतिक्रमण हटवण्याची मागणी शहाजी भालेराव यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठांकडे केली आहे. जिल्ह्यातील नावारूपाला आलेल्या या ग्रामपंचायतीच्या शासकीय गावठाण जमिनीवर २०२२ पासून तत्कालीन लोकप्रतिनिधींसह आजी-माजी सरपंच व लोकप्रतिनिधींनी जल जीवन मिशनच्या पाण्याच्या टाकीच्या सभोवतालच्या गावठाण जमिनीवर अतिक्रमण करून लोखंडी पत्राचे शेड निर्माण केले आहे. दारुडे व जुगाऱ्यांच्या या उच्छादामुळे गावातील नागरिकांना मोठा त्रास होत असून सदर अतिक्रमण हटवून शासकीय जमीन ताब्यात घेण्याची मागणी गावातील नागरिक शहाजी भालेराव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# लोहा कृर्षी उत्पन्न बाजार समिती उपसभापतीचे दालन म्हणजे आंबट शौकीनाचे माहेर घर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १६ जानेवारी**

कृर्षी उत्पन्न बाजार समितीवर उच्च शिक्षित व्यक्ती म्हणुन सभापती म्हणुन विक्रांत शिंदे तर उपसभापती आण्णासाहेब पवार यांची निवड झाली पण या कृर्षी उत्पन्न बाजार समितीकडे सभापती चे साफ दुर्लक्ष झाल्याने सभापती व उपसभापतीचे दालन म्हणजे टवाळखोरी आंबट शौकीनाचे माहेर घर झाल्याचे शेतकरी व व्यापारी हमाल माथाडी यांच्या चर्चातुन ऐकायला मिळत आहे.

कृर्षी उत्पन्न बाजार समिती एकेकाळी मराठवाड्यातील दर्जेदार समिती म्हणून गणली जात होती पण काही काळानंतर या समितीवर अनुभव नसलेल्या पदाधिकाऱ्याची निवड झाल्याने बाजार समितीचे गतवैभवाला फटका बसला आहे. मागील काळातील निवडणुकीमध्ये विविध घटक पक्षाची मोट बांधून राष्ट्रीय पक्षाने अंतकाळ सत्ता असलेलेचा बुरुज ढासाळुन बाजार समिती नुतन संचालकाच्या ताब्यात दिली.या समितीवर उपसभापतीची सर्वानुमते निवड करुन गतवैभव मिळेल हि अपेक्षा ठेवली आणि पदावर विराजमान केले.या पदाला नुतन घटक पक्षातील संचालकाने विविध बाजुने विरोध दर्शविल्याने उपसभापती पदासाठी रसिखेच झाली होती.विविध घटक पक्षाचा जिल्हा स्तरावर दबदबा नसल्याने उपसभापती पदासाठी नुतन संचालकाला खाली हाथ झडकत बसावे लागले.या निवडीमध्ये राष्ट्रीय पक्षाचा जिल्ह्यावर दबदबा आसल्याने त्यांच्या वकृदृष्टीने अनुभव नसलेला संचालक उपसभापती होण्याचा मान मिळाला.यामध्ये सर्वानुमते एक.. एक वर्षे उपसभापती होण्याचा मान मिळेल आशा ठराव हि मंजूर झाला पण वरिष्ठ स्तरावर पक्षात बिघाडी झाल्याने काही नेत्याचे पक्षांतर झाले आणि कृर्षी उत्पन्न बाजार समितीवर अवकळा आली. विकासाच्या नावाने बोंबाबोंब झाली पण पदाला चिटकुन बसलेल्या पदाधिकऱ्यावर शेतकरी व्यापारी हामाल नाराजी व्यक्त करत आहे. या बाजार समितीत कुठलीच सुविधा नाहीत शेतकऱ्यांची मोठ्या प्रमात फसवून केली जाते व्यापारी धोरणाला सहमती दर्शवली जाते. शेतकरी निवारा नाही,शेतकरी व्यापारी,हामाल च्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत ,शेतकऱ्यांच्या शेतीविषयक बैठक घेतली जात नाही , शेती उत्पन्न व बाजार भाव शेती विषयक धोरणाला बगल देऊन व्यापाऱ्याच्या हिताची काळजी घेतली जाते.शेतकऱ्याच्या शेतीचा माल मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आसते.यातुन शेतकऱ्याला गंडवले जाते. हामाला माथाडी कामगाराच्या अडचणी सोडविणे गरजेचे असताना या विकासाकडे दुर्लक्ष करुन दुपारचा मोह आवरत नसल्याने टवाळखोरीने आंबट शौकीनाच्या टवाळीत वाढ होताना दिसुन येत आहे. यामुळे शेतकरी व व्यापारी या वृर्तीला वैतागून गेले आहेत.

# कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालयात भूगोल दिन

**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव,दि. १६ जानेवारी**

दि. १६ जानेवारी २०२५ रोजी कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालयामध्ये भूगोल विभागाकडून भूगोल दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. प्रो. डॉ. पंचशील एकंबेकर हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कार्यवाहक प्रा. डॉ. चरणसिंग राठोड आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे भूगोल प्रमुख प्रा. डॉ. सय्यद हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. कळसकर यांनी केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कळसकर सर यांनी भूगोल दिन हा १४ जानेवारी रोजी साजरा केला जातो १४ जानेवारी हा मराठी महिन्यानुसार मकर संक्रांतीचा दिवस आहे. या सणाचे महत्त्व असे की या सणाला तिळगुळ वाटप केला जातो. तिळगुळ यामध्ये गुळाचे आणि तिळाचे प्रमाण असते, गुळ हे उष्णतेचे प्रतीक तर तीळ हे



कणाची प्रतीक असते म्हणजेच मकर संक्रातीपासून सूर्याच्या उत्तरायणला सुरुवात होते असे मानले जाते. (२१ डिसेंबर रोजी सूर्य मकरवृतावर असतो) म्हणजेच सूर्याच्या उत्तरायणला सुरुवात होते.

भूगोल दिन साजरा करण्याची सुरुवात डॉ. सुरेश गरसोळे यांनी केली. प्रा. सी.डी. देशपांडे यांनी भूगोलामध्ये केलेले लिखाण भूगोलाच्या विकासासाठी केलेले प्रयत्न आणि भूगोला ज्ञानाच्या प्रसारासाठी केलेले कार्य आहे. तसेच

भारतीय संस्कृतीवर असलेला भूगोलाचा प्रभाव यावर प्रकाश टाकत असताना प्रा. डॉ. सय्यद सर म्हणाले की भारतामध्ये साजरी केली जाणारे सण उत्सव हे पर्यावरणाला अनुसरून साजरे केली जातात पर्यावरण हा विषय भूगोलाचा एक अविभाज्य घटक आहे. अशा प्रकारचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. भूगोल दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. पंचशील एकंबेकर सर यांनी अध्यक्षीय समारोप करत असताना भूगोल विषयांमध्ये तिन्ही अवरणाचा अभ्यास केला जातो वातावरण, जलावरण आणि जीवावरण या अवरणाचा अभ्यास म्हणजेच पृथ्वी आणि पृथ्वीशी संबंधित असलेल्या सर्व घटकांचा अभ्यास भूगोलामध्ये केला जातो त्यामुळे मानवी या भूगोलाचा एक घटक असल्यामुळे मानवाच्या संपूर्ण कार्य कौशल्याचा अभ्यास भूगोलामध्ये केला जातो.

या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. पल्लवी कनाडे यांनी मानले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन पवार यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बिरादार, प्रा. डॉ. बालाजी राठोड प्राध्यापिका डॉ. शहाणा पटेल, पवार सर, झमकाडे जयप्रकाश, रोहित कांबळे, संतोष सुरेवार तसेच भूगोल विषयाचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ .बालाजी राठोड सर प्रा. डॉ. शहाणा पटेल मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


## संक्षिप्त वृत्त



### नव्या पिढीने नामांतर लढ्याचा इतिहास जाणून घेणे गरजेचे : रत्नाकर महाबळे

**लोहा**-येणाऱ्या नवीन पिढीने नामांतर लढ्याचा इतिहास जाणून घेतला तरच नामांतर लढ्यात मराठवाडा कसा तत्कालीन राज्यकर्त्यांनी धुमसत ठेवला याची जाणीव त्यांना कळणार आहे असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पर्यटन सचिव तथा पत्रकार रत्नाकर महाबळे यांनी नामविस्तार दिनाच्या कार्यक्रमानिमित्त केले. औरंगाबाद येथील विद्यापीठाचा १४ जानेवारी १९९४ या दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला तो नामविस्तार दिन भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने क्रांतीसुर्य बुद्ध विहार या ठिकाणी साजरा करण्यात आला यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे माजी अध्यक्ष ई जे बनसोडे, व्ही के कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष बापूसाहेब कापुरे सरचिटणीस धोंडीबा यानभुरे , समता सैनिक दलाचे उपाध्यक्ष सुभाष खाडे ,माजी मुख्याध्यापक यादवराव महाबळे, जेष्ठ कार्यकर्ते गंगाधरराव महाबळे, साहित्यिक राजाभाऊ बनसोडे,देविदास महाबळे, केशवराव एडके,, माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई कांबळे, सरिता महाबळे भागाबाई महाबळे, सिताराम गवारे,भावे मामा यांच्या सह बौद्ध बांधव उपस्थित होते. ज्या महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्याची राजधानी असलेल्या औरंगाबाद येथे गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी १९५४ ला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली त्यामुळे मराठवाड्याच्या जनतेने मराठवाडा विद्यापीठाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावं यासाठी मागणी केली आणि त्यावेळच्या राज्य सरकारने दोन्ही सभागृहात तो ठराव पारित करून घेतला पण नामांतर मात्र गुलदस्त्यात ठेवला त्यामुळे मराठवाड्यातील आंबेडकरी जनतेला तब्बल सोळा वर्ष संघर्ष करावा लागला यात अनेकांना वीरमरण आले तर मराठवाड्यामध्ये दंगली पेटल्या गेल्या दलितांची घरे बेचिराक करण्यात आली महिलांवर अत्याचार करण्यात आले. तेव्हा कुठे सरकारला जाग आली आणि त्यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर न करता नामविस्तार १४ जानेवारी १९९४ या दिवशी केला. हा जाज्वल इतिहास येणाऱ्या पिढीने अभ्यासला पाहिजे तरच त्यांना आपल्या पूर्वजांनी कशा पद्धतीने नामांतराचा लढा लढला तो कळणार असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी व्ही के कांबळे, ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधर महाबळे यादवराव महाबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### नगर परिषदेच्या वतीने दिनदर्शिकेचे अनावरण



**मुदखेड**-मुदखेड नगर परिषदेच्या वतीने २०२५ दिनदर्शिका कॅलेंडर चे अनावरण मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या उपस्थित करण्यात आले. शहरातील नगरपरिषद क्षेत्रातील पालिका कर भरणा करणाऱ्या नागरिकांना २०२५ दिनदर्शिका कॅलेंडर देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला असून त्या दिनदर्शिकाचं आज वाटप करण्यात आले आहे. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे, दिलीप पवार, मोहन कवळे, अनंत कुलकर्णी, सुनिल माळी, मोहण पांचाळ, लेखापाल पौळ, सुशिल खिल्लारे, अजीम वलीउल्ला, सचिन चुंचे, गजानन गादगे, राहुल चौदंते,शोभाबाई चिंतेवाड यांच्या सह अदी कर्मचारी उपस्थित होते.

# हेल्मेट घातल्याशिवाय दुचाकीवर घराबाहेर पडु नका : अनिकेत गुंजाळ





**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. १६ जानेवारी**

मुलांनी आपल्या पालकांना दुचाकी वर बाहेर जाताना हेल्मेट घालुनच बाहेर जाण्याचे सांगावे कारण नांदेड जिल्ह्यात दरवर्षी किमान ३५० ते ४०० नागरिक रस्ते अपघातात मृत्यामुखी पडतात त्यामध्ये केवळ दुचाकी द्वारे अपघात होऊन सुमारे १७५ ते २०० म्हणजेच पन्नास ते साठ टक्के नागरिक मृत्यूमुखी पडतात सर्व दुचाकी चालवणाऱ्या नागरिकांनी हेल्मेटचा वाफर केल्यास साठ टक्क्याच्या वर अपघाताचे प्रमाण कमी होऊ शकते उपरोक्त सर्व बाबीचा विचार करून जिल्हा रस्ता सुरक्षा समिती व नांदेड प्रादेशिक परिवहन विभाग ''हेल्मेटयुक्त अपघातमुक्त गाव'' अशी संकल्पना राबविण्यात येत असल्याची माहिती सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अनिकेत गुंजाळ यांनी दिली सोनखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व केंद्रीय कन्या शाळा सोनखेड येथे विद्यार्थ्यांना माहिती दिली यामध्ये रस्ते वाहतूकीचे चिन्हे, सायकलिंग सुरक्षा, स्कुल बस सुरक्षा, पादचाऱ्यांसाठी सुरक्षा, आपत्कालीन परिस्थिती, हेल्मेट, सिटबेल्ट, रस्त्यावर आदेश देणारी चिन्हे व सावधान करणारी चिन्हे, माहिती देणारी चिन्हे कशी ओळखावी अशा प्रकारची माहिती सविस्तर पणे विदयार्थ्यांना सांगितली. या वेळी सर्व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्यध्यापक कविता मुदखेडे यांनी केले व आभार श्री चिद्रावार यांनी केले.

# खा. अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १६ जानेवारी**

माजी मुख्यमंत्री तथा भाजपाचे नेते अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदचे वाजेगाव सर्कलचे माजी जि.प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक १५ जानेवारी रोजी दक्षिण मतदार संघातील अनेक गावातील सरपंच, उपसरपंच,पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला यावेळी अशोकराव चव्हाण यांनी पक्ष प्रवेश दिला.

नांदेड दक्षिण मतदार संघातील वाजेगाव सर्कलचे माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी भारतीय जनता पार्टीचे नेते अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण मतदार संघातील अनेक गावातील सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी भाजपात प्रवेश केला.यावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांना



दस्ती पांघरून पक्ष प्रवेश करून घेण्यात आला. या प्रसंगी वाजेगाव सर्कल माजी सदस्य मनोहर पाटील शिंदे, गंगाप्रसाद काकडे ,धनेगाव ग्रामपंचायत सरपंच गंगाधर ऊर्फ पिंटु पाटील शिंदे, यांच्यासह गोपाळ चावडी माजी सरपंच साहेबराव सेलुकर, धनेगाव ग्रामपंचायत सरपंच गंगाधर ऊर्फ पिंटु पाटील शिंदे,बाभुळगाव सरपंच पुंडलिक मस्के,वांगी सरपंच दता पाटील जाधव,पिंपळगाव मिश्री सरपंच माध० पाटील पुयड,कल्हाळचे विठ्ठल कळके, पांगरी हनमंत घोगरे,गाडेगाव संदीप धुमाळे, माजी सरपंच मारोतराव संगेकर उपसरपंच फत्तेपूर, आनंदराव अवातिरक माजी सरपंच सिध्दनाथ , माजी सरपंच गोविंदराव जाधव वांगी,पंचायत समिती सदस्य गंगाधर नरवाडे, बबुवान उपसरपंच खडकुत, नागोराव जाधव माजी उपसरपंच वांगी,बबन मेकाले माजी उपसरपंच पांगरी,यांच्या सह काँग्रेस पदाधिकारी सतिश बसवदे,रमेश तालीमकर ,चिमणाजी पाटील कदम,राजेश बोटलावार,शंकर शिंदे,गंगाधर देशमुख ० राष्ट्रवादीचे गंगाधर कवाळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य राजकीय पक्षांच्या पदाधिकारी सह अनेकांनी भाजपा पक्षांत प्रवेश केला. यावेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार अमर राजूरकर माची उपस्थिती होती.

# राजीव गांधी महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन व सामुहिक वाचन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १६ जानेवारी**

दि. १० जानेवारी रोजी मुदखेड येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प महाराष्ट्राच्या या उपक्रमांतर्गत ग्रंथालय व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये पुस्तक प्रदर्शन, निबंध स्पर्धा, सामूहिक वाचन व काव्यवाचन हा उपक्रम हे घेण्यात आला आहे. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

महा-विद्यालयातील ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. नंदा करंजकर व मराठी विभाग डॉ. संदीप कोरडे, ग्रंथालय परिचर जे टी पांचाळ यांनी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम आयोजित केला. पुस्तक प्रदर्शन या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी केला या कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ.राहुल धावारे, डॉ. दत्ता मेहत्रे, डॉ. कोंडेकर, डॉ. विजयसिंह ठाकूर, शिवराज कदम, डॉ. सतीश उमाटे, डॉ. मोकले, अरुण कुमार जाधव, प्रा.सुलोचना माळवे, प्रा.निकिता शिंदे, कार्यालयीन प्रमुख डोंगरे, तसेच डहाळे, डांगे, सुरेखा कांजाळकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप कोरडे यांनी केले, तर आभार डॉ. राहुल धावारे यांनी मानले.

# देवसरकर यांचा ७० पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह अभ्यास दौरा व महाराष्ट्र दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १६ जानेवारी**

जिल्हा परिषद आष्टी गटातील ७० प्रगतशील शेतकरी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, प्रमुख पदाधिकारी यांच्यासह ४ दिवसाचा अभ्यास दौरा, महाराष्ट्र दर्शन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य भागवत देवसरकर यांनी राज्यात केला आहे. बहुतांश पदाधिकारी हे शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान, आधुनिक शेती व विविध शेती विषयक उपक्रमाची माहिती होण्यासाठी हा शेतकरी दौरा केला.

अभ्यास दौर्याची सुरुवात नरसी नामदेव येथील श्री संत नामदेव महाराजांचे दर्शन घेऊन



केली. यानंतर सिंदखेड राजा येथील राष्ट्रमाता जिजाऊंचे दर्शन, शिर्डी येथील श्री साईबाबाचे दर्शन, बाबळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्रास भेट देत अनेक विविध पिकांची पाहणी केली. तसेच सासवड येथे संत श्री सोपानकाका समाधीचे दर्शन, जेजुरीच्या खंडेरायाचे दर्शन, बारामती येथे कृषी विज्ञान केंद्राच्या कृषी प्रदर्शनाची पाहणी करून विविध पिकांची प्रात्यक्षिकांची माहिती घेतली. सासवड येथे सर्वांना संघटनात्मक बांधणीचे प्रशिक्षण देण्यात आले. शिखर शिंगणापूर येथे मोठा महादेवांचे दर्शन, पंढरपूर येथील श्री विठ्ठलाचे दर्शन करून तुळजापूर येथील कृषी विज्ञान केंद्राच्या अनेक सेंटरला शेती उपयोग अवजारे नवीन नवीन उपक्रमाची माहिती घेत या शेतकरी अभ्यास दौराची सांगता झाली. शेतकरी अभ्यास दौरा व महाराष्ट्र दर्शनचे नियोजन भागवत देवसरकर यांच्या नेतृत्वात माजी सरपंच ओम इन्देवार, मोरेश्वर माने, शंकर जगदाळे, स्वप्निल रामगिरवार, अरविंद हुडेकर, देवानंद वानखेडे, स्वप्निल पाटील नवले, दशरथ हमांद, देवानंद पाटील शिंदे, सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनात आष्टी जिल्हा परिषद गटातील ७० पदाधिकाऱ्यांचा ऐतिहासिक अभ्यास दौरा मोठ्या उत्साहात पार पडला असून सर्वांना नवीन नवीन उपक्रमांची माहिती मिळाली असून एकमेकांच्या उपयोगी पडून संघटनात्मक बांधणीसाठी येणाऱ्या काळात उपयोगी पडणार आहे.